# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

**रायगड** मंगळवार । दि. २३ जून २०२६ । अंक १७ । पृष्ठे ८ । किंमत ४ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## ब्रिटीश पंतप्रधानांचा राजिनामा

**लंडन :** ब्रिटिश पंतप्रधान कीर स्टारमर यांनी पंतप्रधान आणि लेबर पार्टीच्या नेतेपदाचा राजीनामा दिला आहे. गेल्या काही महिन्यांत, अनेक खासदार आणि मंत्र्यांनी त्यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. स्थानिक निवडणुकांमधील पक्षाची खराब कामगिरी आणि घटत्या लोकप्रियतेमुळेही त्यांच्यावरील दबाव वाढला आहे. एका वृत्तानुसार, अँडी बर्नहॅम हे त्यांचे उत्तराधिकारी होण्याच्या शर्यतीत आघाडीवर आहेत. त्यांनी नुकतीच मेकरफिल्ड पोटनिवडणूक जिंकून संसदेत पुनरागमन केले.

## अण्णा हजारे उपोषणाला बसणार

**मार्तंड बुचुडेपारनेर :** माहिती अधिकार कायद्याची परिणामकारकता कमी करणाऱ्या प्रस्तावित दुरुस्त्या तातडीने मागे घ्याव्यात, अन्यथा दि.५ जुलैपासून राळेगणसिद्धी येथे बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे दिला आहे. त्यांनी म्हटले आहे की, माहिती अधिकार कायदा हा सामान्य नागरिकांच्या हातातील भ्रष्टाचाराविरोधातील प्रभावी शस्त्र आहे. या कायद्यात बदल करून त्याची धार बोथट करण्याचा कोणताही प्रयत्न लोकशाहीसाठी घातक ठरेल.

# वे|ध|क

## रेल्वेच्या धडकेत महिलेचा मृत्यु

**रसायनी :** रसायनीत रेल्वेची धडक लागून एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. हिरा रघुनाथ कातकरी (५६) असे या महिलेचे नाव आहे. त्या पलाटवारी कातकरवाडी येथील गुळसुंदे रेल्वे गेट नं.५ परिसरातील रेल्वे ट्रॅकवर अनावधाने गेल्या. त्यावेळी त्या ट्रॅकवर आलेल्या दिवा-रोहा मेमो ट्रेनची या महिलेला जोराने धडक बसली. या धडकेत हिरा कातकरी यांना गंभीर दुखापती झाल्याने त्या बेशुद्ध पडल्या. तात्काळ त्यांना ग्रामीण रुग्णालय चौक येथे दाखल •> पान २ वर

## कारसह मृतदेहाच्या उडाल्या चिंधड्या

**ठाणे :** बदलापूरमध्ये पहाटेच्या सुमारास एका भीषण अपघाताची घटना घडली आहे. योगेश नेगी या तरूणाच्या वाढदिवसाची पार्टी साजरी केल्यानंतर बीएमडब्लू कारने लाँग ड्राईव्हला गेलेल्या तरुणांच्या कारला नव्याने उभारण्यात येणाऱ्या बडोदा-जेएनपीटी महामार्गावर धडक बसली. केवळ दोन आसनांची क्षमता असलेल्या या स्पोर्ट्स कारमध्ये योगेशसह मैत्रीण रेबिका जेकब व कारमालक अंगद गिल असे तिघेजण प्रवास करत होते. कारचा वेग इतका •> पान २ वर

## कामगाराचा मृत्यू

**रायगड :** अलिबाग तालुक्यातील आवासमधील सुरेखार मळा येथे एका कामगाराचा अपघाती मृत्यू झाला आहे. ही घटना रविवारी (दि.२१) दुपारी घडली असून, याप्रकरणी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. हॉटेलचे बांधकाम सुरु असताना हा अपघात झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. मिळालेल्या माहितीनुसार, नकूल गुरुदेव मंडल (३६) असे या कामगाराचे नाव आहे. हा कामगार मुळचा बिहार राज्यातील असून सध्या आवास येथे राहत होता. आवासमधील सुरेखार मळा जे •> पान २ वर

# मेघ बरसले... पण तूट शंभरीपार

## मुरूडमध्ये सर्वाधिक, तर पनवेलसह सात तालुक्यांत कमी पाऊस; बळीराजाला दिलासा



(छायाचित्र : सुधीर नाझरे)

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

दिर्घ प्रतीक्षेनंतर अखेर सोमवारी (दि. २२) रायगड जिल्ह्यात मान्सूनने दमदार हजेरी लावली. जिल्ह्यातील बहुतांश भागात पावसाच्या जोरदार सरी कोसळल्याने उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांसह बळीराजालाही मोठा दिलासा मिळाला. दिवसभर अधूनमधून झालेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून खरीप हंगामाच्या कामांनाही वेग येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. जिल्ह्यात सोमवारी सरासरी ११.४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. तालुकानिहाय आकडेवारीनुसार, मुरूड तालुक्यात सर्वाधिक पाऊस झाला. त्याखालोखाल अलिबाग, पोलादपूर, महाड, उरण आणि रोहा तालुक्यांमध्येही समाधानकारक पावसाची नोंद झाली.

### पाणी संकट कायम

रायगड पाटबंधारे विभागाच्या अखत्यारित २८ धरणे आहेत. त्यामध्ये अलिबाग तालुक्यातील अलिबाग, मुरुड, तळा, पेण, उरण व रोहा या तालुक्यात प्रत्येकी एक धरण आहे. तर, सुधागडमध्ये पाच, श्रीवर्धनमध्ये तीन, म्हसळामध्ये दोन, महाडमध्ये चार, कर्जतमध्ये दोन, खालापूरमध्ये तीन व उरणमध्ये तीन धरणांचा समावेश आहे. त्यातील फणसाड व कोथुर्डे धरणात शुन्य टक्के, ढोकशेत व बामणोलीत दोन टक्के, उन्हेरे व घोटवडेमध्ये चार टक्के, रानवली, उसरण व पाभरेमध्ये सहा टक्के, डोणवतमध्ये दहा टक्के, कवेळे व श्रीगावमध्ये अकरा टक्के, कोंडगाव, अवसरे, साळोख, कलोते-मोकाशी व खैरेमध्ये १५ ते १८ टक्के, तसेच अन्य धरणांमध्ये २२ ते ४८ टक्के इतका जलसाठा शिल्लक आहे. त्यामुळे पाऊस पडला असला, तरी जिल्ह्यामध्ये पाणी संकट कायमच आहे.

जून महिन्याच्या सुरुवातीपासूनच पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिक चिंतेत होते. मात्र सोमवारी झालेल्या पावसामुळे पेरणीपूर्व मशागतीच्या कामांना चालना मिळणार असून, पाणीसाठ्यांमध्येही काही प्रमाणात वाढ होण्याची अपेक्षा आहे. असे असले तरी, यंदाच्या मान्सूनची सुरुवात अद्यापही समाधानकारक म्हणता येणार नाही. जिल्ह्यात आतापर्यंत झालेल्या पावसाची तुलना गतवर्षीच्या याच कालावधीशी केली असता जवळपास शंभर टक्के तूट असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

यंदा जूनच्या पहिल्या आठवड्यात पडणारा पाऊस लांबणीवर गेल्यामुळे तापमानात प्रचंड वाढ झाली होती. त्यामुळे उकाड्याने नागरिक त्रस्त झाले होते. धरण, विहीरी व तलावांमधील पाण्याच्या पातळीतही मोठी घट झाली. त्यामुळे जिल्ह्यातील धरणांमध्ये १७.६७ टक्के इतकाच जलसाठा शिल्लक राहिला असून, पाणी संकट निर्माण झाले. तसेच, शेतकरी पेरणीसाठी सज्ज झाले होते. मात्र, पावसाअभावी भात शेती अडचणीत सापडली होती. •> पान २ वर

# ‘टायगर’च्या मोहिमेत गद्दारांची एन्ट्री

## नागेश पाटील आष्टीकर यांची हकालपपट्टी

। मुंबई । प्रतिनिधी ।

ठाकरेसेनेच्या ६ फुटीर खासदारांनी शिंदेसेनेत प्रवेश केला आहे. मुंबईतील वाय.बी. चव्हाण सेंटरमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत ठाकरे गटाचे खा. ओमराजे निंबाळकर, भाऊसाहेब वाकचौरे, नागेश पाटील आष्टीकर, संजय जाधव, संजय दिना पाटील, संजय देशमुख या ६ खासदारांनी सोमवारी (दि.२२) शिंदेसेनेत प्रवेश केला. दरम्यान, फुटीर खासदार आष्टीकरांच्या मुलाची ठाकरेसेनेतून हकालपट्टी करण्यात आली आहे. एकनाथ शिंदे यांनी राबविलेल्या ऑपरेशन टायगर या मोहिमेत गद्दारांनी एन्ट्री केल्याची चर्चा सोशल मिडियामध्ये चांगलीच रंगली होती.

हिंगोली जिल्ह्याचे शिवसेना (ठाकरे गट) पक्षाचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी फुटीर भूमिका घेतल्यानंतर राजकीय वर्तुळाचे लक्ष नांदेड विधान परिषद •> पान २ वर

### महायुतीची १०० मते फुटली

सांगली-सातारा विधान परिषद निवडणुकीतील महायुतीचे उमेदवार धैर्यशील कदम यांनी ३०१ मतांनी विजय मिळवला असून, त्यांना ५९३ मते मिळाली. महाविकास आघाडीचे उमेदवार अभयसिंह जगताप यांनी देखील २९२ मते मिळवत चुरशीची लढत दिली. स्थानिक आघाड्या आणि अपक्षांपैकी बहुतांश मते ही महायुतीच्या गोटातील होती. तरी देखील महाविकास आघाडीचे उमेदवार अभयसिंह जगताप यांनी महायुतीची तब्बल १०० मते फोडल्याचे निकालात स्पष्ट झाले आहे.

### नाशिकमध्ये महायुतीला धक्का

नाशिक स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत भाजपमधून बंडखोरी केलेल्या अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांनी महायुतीचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांचा धुव्वा उडवला आहे. या पराभवामुळे नाशिकच्या राजकीय वर्तुळात महायुतीला मोठा धक्का बसला आहे. या निवडणुकीत गिते यांनी एकूण ६०५ वैध मतांपैकी तब्बल ३५७ मते मिळवली. तर, महायुतीचे नरेंद्र दराडे यांना केवळ २४८ मते मिळवता आली.

## केंद्रस्तरिय अधिकाऱ्यांमार्फत मतदारांची मॅपिंग



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी।

निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम आयोजित केला आहे. हा कार्यक्रम दि.३० जून ते ७ ऑक्टोबर या कालावधीत राबविला जाणार आहे. मतदान केंद्रस्तरिय अधिकाऱ्यांमार्फत होणार मतदारांची मॅपिंग केली जाणार असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी दिली.

रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदार संघापैकी अलिबाग विधानसभा मतदार संघातील दि.२२ जून पर्यंतच्या मतदारांची संख्या ३ लाख ९ हजार ५८० इतकी आहेत. आतापर्यंत मतदान केंद्रस्तरिय अधिकारी अर्थात बीएलओ मार्फत २ लाख ३८ हजार ७४१ मतदारांची मॅपिंग करण्यात आली आहे. त्यामुळे ७० हजार ८३९ मतदारांची मॅपिंग शिल्लक राहिली आहे. दि.३० जून ते २९ जूलै या कालावधीत मतदान केंद्रस्तरिय अधिकारी यांच्या मार्फत घरोघरी भेटी घेतल्या जाणार आहे. आयोगाकडून प्राप्त झालेल्या इन्युमरेशन फॉर्ममध्ये मतदारांची माहिती •> पान २ वर

## नेरळ पंचायतीत विनापरवाना नळजोडणी



। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ ग्रामपंचायतीतील गेली अनेक वर्षे अनागोंदी कारभार सुरू आहे. मात्र, आता ग्रामपंचायत प्रशासनाकडून कठोर कारवाई सुरू झाली आहे. दरम्यान, ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची परवानगी न घेता पाणी पुरवठा विभागाच्या दोन कर्मचाऱ्यांनी नळजोडणी करून दिली होती. त्या नळजोडणींबाबत आक्षेप घेण्यात आल्यानंतर त्या नळजोडण्या संबंधित कर्मचाऱ्यांकडून कापून टाकण्यात आल्या होत्या. त्यामुळे त्या दोन्ही कर्मचाऱ्यांचे नेरळ ग्रामपंचायतीकडून निलंबन करण्यात आले आहे. •> पान २ वर

## डिझेल दरवाढीविरोधात मच्छिमार आक्रमक

### सहकारी संघाच्या विशेष बैठकीत तीव्र नाराजी




। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

आंतरराष्ट्रीय युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरातील तफावत प्रति लिटर ५५ रुपयांपर्यंत पोहोचली आहे. इंधनावरील प्रचंड खर्चामुळे मच्छीमार अक्षरशः मेटाकुटीला पोहोचला असून, मासेमारी व्यवसायाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शासनाच्या या भूमिकेविरोधात मच्छिमार संघ आक्रमक झाले असून, महाराष्ट्र राज्य मच्छीमार सहकारी संघाच्या विशेष बैठकीत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. मच्छिमारांसाठी स्वतंत्र विशेष डिझेल प्रवर्ग निर्माण करून सवलतीच्या दरात इंधन उपलब्ध करून द्यावे, मच्छीमारांना रिटेल •> पान २ वर

## कोचिंग सेंटरला भीषण आग

। लखनऊ । वृत्तसंस्था ।

लखनऊ येथे एका कोचिंग सेंटरला सोमवारी (दि.२२) भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या दुर्घटनेत १४ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. तसेच, काही विद्यार्थी जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, लखनऊमधील अलीगंज •> पान २ वर

## विंधने येथील खाण चोरीला



- **तक्रार करूनही कारवाई नाही**
- **शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडीत**

। उरण । प्रतिनिधी ।

पैसे, सोन्याचे दागिने तसेच वाहन चोरीला गेल्याचे अनेक प्रकार समोर येत असतात. आता मात्र चक्क दगड खाण व टेकडीच चोरीला गेल्याचा प्रकार समोर आला आहे. उरणता लुक्यातील विंधने येथील अवैध दगड खाण बुंजविण्याचे काम सध्या हाती घेण्यात आले आहे. यासंदर्भात उरण तहसील कार्यालयात तक्रार अर्ज दाखल करुनही संबंधितांवर कारवाई करण्यात येत ओलेली नाही. त्यामुळे शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडीत निघत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

उरण तालुक्यात औद्योगिककरण व नागरिकरण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे या ठिकाणी विकासाच्या नावाखाली शासकीय अधिकाऱ्यांच्या कृपाशिर्वादाने मोठ्या प्रमाणात मुरुम, माती आणि दगडांचे उत्खनन होत असून, झाडांची छाटणी देखील मोठ्या प्रमाणात होत आहे. उरण तालुक्यातील चिरनेर ते दिघोडे रस्त्याजवळील विंधने सर्व्हे नंबर ३५/१/ब/२ व परिसरात जवळपास सुमारे १० एकर क्षेत्रातील जमिनीवर ५० फुट खोल उत्खनन करण्यात आले आहे. माती आणि दगड काढण्याचे काम संबंधित व्यवसायिकांनी सुरू केले आहे. एकंदरीत गौणखणिज ही शासनाची मालमत्ता असते. शासनाच्या परवानगीशिवाय ती विकता येत नाही. त्यामुळे अवैधरीत्या ते चोरून विक्री करणे दखलपात्र गुन्हा आहे. असे असतानाही माती व दगड कोणाला आणि किती रुपयांना विकला जात आहे? यासंदर्भात उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम, जिल्हाधिकारी व कोकण आयुक्तांकडे तक्रार करण्यात आली. परंतु, महसूल विभागाच्या •> पान २ वर


शाश्वत भविष्यासाठी ऊर्जेची नवी दिशा

NewAge Solar

सरकारी अनुदानासह मोठी बचत करा

₹78,000 ३ किलोवॅट पर्यंत अनुदान (सोसायटी व बंगलो प्रकल्पांसाठी लागू)

- विश्वसनीय
- प्रभावी
- पर्यावरणपूरक

- आमच्या सेवा -

- रेसिडेन्शियल व कमर्शियल सोलर सिस्टिम्स
- सोलर स्ट्रीट लाईट्स व CCTV सोल्यूशन्स
- शेतीसाठी सोलर पंप
- घरासाठी UPS (इन्व्हर्टर व बॅटरी व्यवस्था)



Shop No 2 , Nana Master Nagar, Near Royal Garden, Karjat-410201

836 982 2813



टीजेएस्‌बी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक

Bharose ka Bank Bhavishya ka Bank

टीजेएस्‌बी सहकारी बँक गेल्या पाच दशकांहून अधिक काळ विश्वास आणि उत्कृष्टतेने तुमची सेवा करत आहे. आम्ही बँकिंग क्षेत्रातील उच्च प्रतीच्या तंत्रज्ञानासह उत्कृष्ट ग्राहक सेवा देण्यास कटीबद्ध आहोत.

कळविण्यास अत्यंत आनंद होतो की,

**अलिबाग शाखेचा उद्‌घाटन समारंभ**

मंगळवार, दि. २३ जून २०२६ रोजी
सकाळी १०.०० वा.

प्रमुख पाहुणे
श्री. रघुजीराजे आंग्रे
(अध्यक्ष - श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे)
यांच्या शुभहस्ते होणार आहे.
तरी या समारंभास आपण अवश्य उपस्थित रहावे, ही नम्र विनंती !

शाखा
अलिबाग शाखा
तळमजला, अहिल्या बिल्डिंग, ब्राह्मण आळी, नेने वडेवाले लेन, अलिबाग-४०२२०१.

कार्यक्रम स्थळ
वेव्हज पार्टी हॉल
ॲक्सिस बँक समोर, कर्वे रोड, अलिबाग, रायगड-४०२२०१.

आपले नम्र
श्री. शरद गांगल (अध्यक्ष)
सीए श्री. वैभव सिंगवी (उपाध्यक्ष)
श्री. निखिल आरेकर (व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी )
संचालक मंडळ

* Necessary authorization under Section 23 read with Section 56 of the Banking Regulation Act, 1949 has been obtained from the Reserve Bank of India for opening of the branch. However, Reserve Bank of India is not liable for any claims regarding financial soundness and accuracy of claims or explanations / opinions thereon, made by the bank.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028
१९३७-२०२६ वर्ष ९०



# कृषी मेळाव्याचे आयोजन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद, कृषी विभाग पंचायत समिती मुरुड-जंजिरा आणि तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय कृषी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा गुरुवारी (दि.२५) सकाळी १०.०० वाजता मुरुड-जंजिरा पंचायत समितीतील दरबार हॉलमध्ये संपन्न होणार आहे. शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, शासनाच्या विविध कृषी योजना, तसेच कृषी क्षेत्रातील नवीन संधींची सविस्तर माहिती मिळावी या मुख्य उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात कृषी विषयक विविध प्रात्यक्षिके व प्रदर्शनांचे देखील आयोजन करण्यात येणार असून, उपस्थित शेतकऱ्यांना तज्ज्ञांकडून प्रत्यक्ष मार्गदर्शन लाभणार आहे. यावेळी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तालुक्यातील प्रगतशील शेतकऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

# रिक्त पदे तात्काळ भरा

## पोलीस पाटील संघाची मागणी

## •अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांना निवेदन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील एक हजारहून अधिक पोलीस पाटीलांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे कार्यरत पोलीस पाटीलांवर कामाचा ताण पडत आहे. तसेच, पोलीस पाटीलांचे मानधन सुरळीत मिळत नाही. त्यांचा गेल्या ५ वर्षांचा प्रवास भत्ता प्रलंबित असून, तो देखील अद्याप मिळाला नाही. त्यामुळे पोलीस पाटीलांची पदे तात्काळ भरण्यात यावीत, तसेच अन्य मागण्यांची दखल घेण्यात यावी, अशी मागमी महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाकडून करण्यात आली आहे.



जिल्ह्यात २ हजार ११८ महसूली गावे आहेत. ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजारहून अधिक आहे. तर, जिल्ह्यात ८६८ पोलीस पाटील कार्यरत आहेत. जिल्ह्यातील गावे, वाड्यांमधील कायदा, शांतता व सुव्यवस्था राखणे, गुन्ह्यांची माहिती देणे, आपत्कालीन परिस्थितीत व निवडणुकीत मदत करणे, तसेच दरोडा, शांतता भंग किंवा इतर गुन्हेगारी कृत्यांपासून गावाला सुरक्षित ठेवणे, गैरवर्तन किंवा दुर्लक्षाच्या घटनांची माहिती संबंधित प्रशासनाला पोहोचवणे, अशा अनेक प्रकारची कामे कार्यरत पोलीस पाटील यांच्या मार्फत केली जातात. शासन आणि जनतेमधील महत्त्वाचा दुवा म्हणून पोलीस पाटील यांच्याकडे पाहिले जाते. मात्र, जिल्ह्यात १ हजार १२१ पदे रिक्त आहेत. कित्येक वर्षे ही पोलीस पाटीलची पदे भरली गेली नाहीत. अलिबाग, कर्जत, माणगाव, रोहा, महाड या उपविभागीय कार्यालयाच्या अखत्यारित दीडशेहून अधिक पदे रिक्त आहेत. श्रीवर्धन, पनवेल या उपविभागीय कार्यालयाच्या अखत्यारित शंभरहून अधिक आणि पेण कार्यालयच्या अख्यत्यारित येणारी ९५ पोलीस पाटील यांची पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांमुळे कार्यरत पोलीस पाटील यांच्यावर कामाचा ताण वाढत आहे. त्यामुळे ही पदे तात्काळ भरण्यात यावी, अशी मागणी पोलीस पाटील संघाकडून करण्यात आली आहेत. त्याचबरोबर जिल्ह्यातील पोलीस पाटील यांचा २०११ पासून २०१६ पर्यंतचा प्रवास भत्ता प्रलंबित आहे. तो लवकरात लवकर मिळावा. तसेच, पोलीस पाटील यांचे मानधन सुरळीत व्हावे, अशी मागणी देखील महाराष्ट्र राज्य गांव कामगार पोलीस पाटील संघाने केली आहे.

याबाबत अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे आणि पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांना निवेदन देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाचे सहसचिव कुणाल लोंढे, सल्लागार नरेश म्हात्रे, जिल्हा अध्यक्ष विकास पाटील, विजय खुटले, सुशील म्हात्रे, अतुल घरत, संकेत कोतवाल, यशवंत जंगम, नितीन पाटील, आभा साळावकर, नारायण पाटील, अपेक्षा कोळपे आदी उपस्थित होते.

## पान १ वरून

## मेघ बरसले...पण तूट शंभरीपार!

कृषी विभागाने पेरणी करू नका, असा सल्ला शेतकऱ्यांना दिला होता. ज्या शेतकऱ्यांनी धुळपेरणी केली होती, त्यांना भात रोपे जगविण्यासाठी विहीरीच्या पाण्याची मदत घ्यावी लागली होती. त्यामुळे नागरिकांसह बळीराजाचे आकाशाकडे डोळे लागले होते. अखेर सोमवारी (दि.२२) सकाळी पहाटेच्या सुमारास विजांच्या कडकडाटांसह पावसाने जिल्ह्यात हजेरी लावली. यावेळी पाऊस जोरदार कोसळल्याने हवेत गारवा निर्माण झाल्यामुळे नागरिकांसह शेकतऱ्यांनी सुटकेचा श्वास घेतला.

गतवर्षी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून पावसाने सुरुवात केली होती. त्यावेळी दि.२२ जून, २०२५ पर्यंत ५२२ मि.मी. इतक्या पावसाची नोंद झाली होती. म्हणजेच एकूण १०८ टक्के पाऊस पडला होता. यावेळी पंधरा दिवसांच्या दिर्घ प्रतिक्षेनंतर रायगड जिल्ह्यामध्ये पावसाने हजेरी लावली. एका दिवसात ११.४ मि. मी. इतका पाऊस पडला. दि.२२ जूनपर्यंत २२.३ मि.मी. इतक्या पावसाची नोंद आहे. त्यामुळे गतवर्षीच्या तुलनेने पाऊस फारस कमी पडल्याचे आकडेवारीनुसार दिसून येत आहे.

**पडलेल्या पावसावर दृष्टीक्षेप :** अलिबाग - २८.२ मि.मी., पनवेल - ०.३ मि.मी., कर्जत - ०.५ मि.मी., खालापूर - १.२ मि.मी., उरण - १५.१ मि.मी., सुधागड - ७.५ मि.मी., पेण - ०.१ मि.मी., महाड - १६.८ मि.मी., माणगाव - ६.५ मि.मी., रोहा - १५.७ मि.मी., पोलादपूर - २५.० मि.मी., मुरुड - ४६.८ मि.मी., श्रीवर्धन - ६.५ मि.मी., म्हसळा - ९.२ मि.मी. तळा - ८.३ मि.मी., एकूण - ११.४ मि.मी.

## कोचिंग सेंटरला भीषण आग

पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पुरनिया परिसरात ही दुर्घटना घडली. आग लागली तेव्हा कोचिंग सेंटरमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित असल्याचे सांगितले जात आहे. काही क्षणांतच आगीने विक्राळ रूप धारण केले आणि संपूर्ण परिसरात एकच गोंधळ उडाला. धुराचे लोट आणि आगीच्या ज्वाळांमुळे घाबरलेल्या काही विद्यार्थ्यांनी स्वतःचा जीव वाचवण्यासाठी इमारतीतून उड्या मारल्याची माहिती समोर आली आहे. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, आग लागल्यानंतर काही मिनिटांतच संपूर्ण इमारतीत धूर पसरला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि पोलीस यंत्रणेची अनेक पथके घटनास्थळी दाखल झाली. अग्निशमन दलाचे जवान आगीवर नियंत्रण मिळविण्यासह इमारतीत अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## विंधने येथील खाण चोरीला

संबंधित अधिकारी वर्गाने शासनाला लाखोंचा महसूल मिळवून देणाऱ्या दगड खाणींच्या उत्खननाकडे कोणत्याही परिस्थितीत पाहणी किंवा कारवाई करण्यासाठी पुढाकार घेतला नाही.

एकंदरीत राज्यात मोठ्या प्रमाणावर अवैध खाणी सुरू असून, त्या सर्व खाणींचे ईटीएस मॅपिंग केले जाईल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत जाहीर केले होते. त्याला मुठमाती देत महसूल विभागाच्या पुढाकाराने ही दगड खाण माती व मुरुम टाकून बुजविण्याचे काम सध्या हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे दगड खाणच चोरीला गेल्याची तक्रार अर्ज दाखल केला असून, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन शासनाची बुडीत निघणारी रॉयल्टी वसुल करण्याची मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री व महसूल मंत्री कशा प्रकारे कारवाई करतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

## कामगाराचा मृत्यू

डब्लू मेरेट या कंपनीच्या बंग्लो साईटवर तो काम करीत होता. अमोल कपाडीया यांच्या मालकीच्या जागेत हॉटेलचे बांधकाम सुरु होते. रविवारी दुपारी काम करीत असताना नकूल मंडल या कामगाराच्या अंगावर एक मोठी फळी पडली आणि तोल जाऊन तो दुसऱ्या मजल्यावरून खाली पडला. त्यामध्ये त्याच्या डोक्याला व शरीराला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर त्याला तात्काळ अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, तो अगोदरच मृत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. याप्रकरणी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेने कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## कारसह मृतदेहाच्या उडाल्या चिंधड्या

प्रचंड होता की, डिव्हायडरला झालेल्या धडकेत कारमधील तरुण आणि तरुणीचे मृतदेह छिन्नविच्छिन्न होऊन रस्त्यावर पडले होते. तर, कार मालक अंगद हा गंभीर जखमी होता. दरम्यान, कारचा स्पीड २५० किमी प्रति तास इतका लाईव्ह व्हिडिओ मोबाईलमध्ये रेकॉर्ड होत असतानाच हा काळजाचा थरकाप उडवणारा अपघात घडला आहे.

## रेल्वेच्या धडकेत महिलेचा मृत्यु

करण्यात आले. मात्र, तेथील डॉक्टरांनी हिरा कातकरी यांना मयत घोषित केले. याप्रकरणी बीएनएस एस १९४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

## 'टायगर'च्या मोहिमेत गद्दारांची एन्ट्री

निवडणुकीच्या निकालाकडे लागले होते. त्यांचे सुपुत्र कृष्णा पाटील आष्टीकर या ठिकाणी महाविकास आघाडीतर्फे ठाकरे गटाकडून रिंगणात उतरले होते. मात्र, निकाल जाहीर झाल्यानंतर काही तासांतच पक्षविरोधी कारवाया केल्याबद्दल ठाकरे गटातून त्यांची हकालपट्टी करण्यात आली आहे. ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांनी सोशल मीडियातून यासंबंधी घोषणा केली. यावेळी नांदेड विधान परिषद निवडणुकीत कृष्णा पाटील यांना केवळ ८४ मते मिळाली, तर माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे विश्वासू असलेले भाजप उमेदवार अमर राजुरकर यांनी ३३९ मते मिळवत विजयाची हॅट्रिक साधली.

## केंद्रस्तरिय अधिकाऱ्यांमार्फत मतदारांची मॅपिंग

भरून घेण्यात येणार आहे. ज्या मतदारांचे मॅपिंग झाले नाही, अशा मतदारांकडून निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आलेल्या कागदपत्रांपैकी तीन दाखले पुरावा म्हणून घेण्यात येणार आहेत. त्यानंतर मतदान केंद्राचे सुसत्रीकरण केले जाणार आहे.

अलिबाग विधानसभा मतदार संघात सध्याच्या स्थितीत ३७५ मतदान केंद्र आहेत. ३९ मतदान केंद्रावर १ हजार २०० किंवा त्यापेक्षा अधिक मतदार आहेत. त्यांचे विभाजन केले जाणार आहे. त्यामुळे ४१४ मतदान केंद्र वाढणार आहेत. दि.५ ऑगस्टपर्यंत प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. दि.४ सप्टेंबरपर्यंत त्यावर दावे व हरकती दाखल करण्याची संधी उपलब्ध केली जाणार आहे. त्यानंतर दि.७ ऑक्टोबरला अंतिम मतदान यादी प्रसिद्ध केली जाणार असल्याचे मुकेश चव्हाण यांनी सांगितले.

## नेरळ पंचायतीत विनापरवाना नळजोडणी

नेरळ ग्रामपंचायतीचा भोंगळ कारभार प्रशासक राजवटी पासून सुरू होता. मात्र, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकी नंतर ग्रामपंचायत कारभारात सुसूत्रतता आणण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. यापूर्वी जिल्हा परिषद सदस्य सुनीता मोरे आणि पंचायत समिती सदस्य भगवान चंचे यांनी ४३ नळजोडण्या बेकायदा देण्यात आल्याचे उघड करून त्या सर्व नळजोडण्या कापून टाकल्या होत्या. त्यानंतर आणखी एक प्रकरण सामाजिक कार्यकर्ते ऋषभ लोहकरे यांनी समोर आणले होते.

नेरळ गावातील चिंचआळी परिसरातील पुष्कर अपार्टमेंट येथे ग्रामपंचायतीकडून कोणतीही परवानगी न घेता दोन नळजोडण्या पाणी पुरवठा विभागाने जोडून दिल्या होत्या. कोणतीही अधिकृत वर्क ऑर्डर नसताना आणि ग्रामपंचायतीची देणगी पावती बनवून घेतली नसल्याने या नळजोडणी बाबत संशय निर्माण झाला होता. ग्रामपंचायतीमध्ये त्या नळजोडणींबाबत आक्षेप घेतल्यानंतर त्या दोन्ही नळजोडण्या संबंधित दोन कर्मचाऱ्यांनी पुन्हा कापून टाकल्या आणि विषय बंद करण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रशासक आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी दि.३ जून रोजी पाणी पुरवठा विभागाच्या त्या दोन कर्मचाऱ्यांना रोजी कारणे दाखवा नोटीस दिली. मात्र, प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली. त्यावेळी केवळ नळजोडणी टाकण्याचे काम नव्हते, तर प्रत्यक्ष नळ कनेक्शन देण्यात आले असल्याचे स्पष्ट दिसून आले. या प्रकरणाची चर्चा सुरू होताच या नळजोडणीबाबत त्या दोन कर्मचाऱ्यांनी दिलेला खुलासा हा समाधानकारक नव्हता. शेवटी नेरळ ग्रामपंचायत प्रशासनाने सोमवारी (दि.२२) पाणी पुरवठा विभागाच्या त्या बेकायदा नळजोडणींबाबत १० दिवसांसाठी निलंबित केले. ग्रामपंचायत प्रशासकांच्या सल्ल्याने ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले यांनी ही निलंबनाची कारवाई केली आहे.

## डिझेल दरवाढीविरोधात मच्छिमार आक्रमक

कॅटगरी प्रमाणेच डिझेलचा पुरवठा करण्यात यावा, अशी एकमुखी मागणी बैठकीत करण्यात आली.महाराष्ट्र राज्य मच्छीमार सहकारी संघ मर्यादित, मुंबई यांच्या अध्यक्षा ज्योती मेहेर यांच्या अध्यक्षतेखाली संघाचे सागरी संचालक मंडळासह, संपूर्ण कोकण किनारपट्टीवरील मच्छीमार सहकारी संस्थांची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी रामदास संधे, ॲड. जे.टी. पाटील, विजय गिदी, जयकुमार भाई, राजेंद्र मेहेर, अर्पिता कोळी, उल्हास वाटकरे, सिराज डोसानी, तुलसी गोहिल व दामोदर चामुडिया आदी मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी मच्छीमारांना कन्जुमर कॅटेगरीमध्ये समाविष्ट केल्यामुळे सातत्याने वाढणाऱ्या डिझेल दरांमुळेमच्छीमारव्यवसायगंभीरसंकटातसापडल्याची भावना व्यक्त करण्यात आली. किरकोळ ग्राहकांना मिळणाऱ्या डिझेल दरापेक्षा कन्जूमर कॅटेगरीमधील दर प्रति लिटर साधारणतः २० ते २५ रुपयांपेक्षा अधिक आकारला जात आहे. मागील ४ ते ५ महिन्यांपासून सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय युद्धजन्य परिस्थितीमुळे या दरातील तफावत ५५ रुपयांपर्यंत पोहोचले. त्यामुळे इंधनावरील प्रचंड खर्चामुळे मच्छीमार अक्षरशः मेटाकुटीला पोहोचला असून, मासेमारी व्यवसायाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मच्छीमारांसाठी स्वतंत्र विशेष डिझेल प्रवर्ग निर्माण करून सवलतीच्या दरात इंधन उपलब्ध करून द्यावे, तसेच मच्छीमारांना प्रमाणेच डिझेलचा पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी बैठकीत करण्यात आली.डिझेलच्या दरवाढीमुळे मच्छिमार संघामध्ये तीव्र संताप निर्माण झाला असून, त्यांनी शासनाच्या भुमिकेविरोधात नाराजी व्यक्त केली आहे. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, तर आगामी काळात तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशाराही देण्यात आला.


## जाहीर नोटीस

सर्व जनतेस व संबंधितांना कळविण्यात येते की, माझे अशिलांनी मौजे महाळुंगे, ता.रोहा, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकती सदर मिळकतींचे विद्यमान मालक १) श्री.प्रविण दामोदर पाटील, २) श्री.नितीन दामोदर पाटील, ३) सौ. अंजली अशोक पाटील, ४) निनाद अशोक पाटील, ५) पंकज अशोक पाटील आणि ६) वृषाली दिलेश पाटील यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| महाळुंगे, ता.रोहा | ३२३ | १-०४-००<br>पो.ख. ०-५३-००<br>एकूण १-५७-०० | ०.७३ |
| आणि | | | |
| मौजे | गट नं. | क्षेत्र हे. आर. | आकार (रु.पै.) |
| महाळुंगे, ता.रोहा | ३१२ | ०-९८-००<br>पो.ख.०-५२-००<br>एकूण १-५०-०० | ०.९३ |

खाते क्र.३१८ मधील एकूण १.५०.०० हे. आर. क्षेत्रापैकी ०.२६.०० हे.आर. क्षेत्र.

आणि सदर मिळकतीवरील ग्रुप ग्रामपंचायत महाळुंगे हद्दीतील घर क्र.१४७

संदर्भित जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमीची असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशीलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्यात कोणत्याही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा करार, वारस, गहाण, अभिहस्तांतरण, बक्षीस, निर्वाह, कब्जा, विक्री, दान, भाडेपट्टा, धरणाधिकार, भार, वहिवाट, बोजा, न्यास, पोटगी, सुविधाधिकार हस्तांतरण, परवाना, कुळवहिवाट अदलाबदल, कोणत्याही तंट्यात किंवा अन्य प्रकारे शोभीत असल्याने कोणताही दावा असल्यास किंवा कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध अधिकार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझेकडे खालील पत्यावर लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २३/०६/२०२६

सही /-
**(ॲड. प्रशांत एच.वर्तक)**
तथास्तु, गोकुळनगर, रेवस बायपास रोड, चेंढरे,
अलिबाग-रायगड

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

**ई-लिलाव सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडद्वारे खालील वेळापत्रकानुसार आयआरईपीएस ई-निविदा प्रणालीवर प्रकाशित केल्यानुसार, व्यावसायिक करारांच्या ई-लिलावाची घोषणा करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कराराचे नाव | करारांची / लॉटची संख्या | ई-लिलावाची दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| 1 | रेल्वेगाडीच्या आतील भागात जाहिरातींचे प्रदर्शन - मडगाव - मंगळुरू - मडगाव (10107/10108) मेमू रेल्वेगाडी आणि दिवा - एसडब्ल्यूव्ही पॅसेंजर (10105/10106) | 02 | 29.06.2026, 11:00 वा. |
| 2 | मडगाव येथे पार्सल स्कॅनर | 01 | 29.06.2026, 11:00 वा. |
| 3 | प्रधान मंत्री भारतीय जन औषधी केंद्र (पीएमबीजेके) - मडगाव | 01 | 0.06.2026, 11:00 वा. |
| 4 | रेल्वेगाडीच्या बाह्य भागावर जाहिरातींचे प्रदर्शन - दिवा - सावंतवाडी रोड पॅसेंजर (10105 / 10106), दिवा - रत्नागिरी पॅसेंजर (50104 / 50103), कोकण कन्या एक्सप्रेस (20112- 20111), मांडवी एक्सप्रेस (10104-10103) | 03 | 30.06.2026, 11:00 वा. |
| 5 | रोड अंडर ब्रिज / रोड ओव्हर ब्रिजजवळ होर्डिंगद्वारे जाहिरात - महाराष्ट्र | 07 | 01.07.2026, 11:00 वा. |
| 6 | चिपळूण, कणकवली, कुडाळ, करमळी, गोकर्ण, होन्नावर, भटकळ आणि सुरतकल स्थानकांवर डिजी लॉकरची स्थापना | 08 | 01.07.2026, 11:00 वा. |
| 7 | एसएलआरचे लीजिंग - रेल्वेगाडी क्र. 11004, 20112, 10104, 10215, 22907, 56615 - II | 06 | 02.07.2026, 11:00 वा. |
| 8 | आडवली, विलवडे, राजापूर रोड, मूकांबिका रोड बैंदूर, पडुबिद्री, बारकूर, काणकोण, कोलाड, मडगाव, रत्नागिरी, थिविम, खेड स्थानकांवर फेअर रिपीटरची स्थापना | 12 | 02.07.2026, 11:00 वा. |
| 9 | थिविम येथे व्हिडिओ वॉल आणि रत्नागिरी, सावंतवाडी रोड, थिविम, करमळी, मडगाव, कारवार, मुल्की, उडुपी स्थानकांवर जाहिरात फलक, होर्डिंग्जद्वारे रेल्वे स्थानकांवर जाहिरात | 09 | 03.07.2026, 11:00 वा. |
| 10 | भटकळ येथे एसी लाउंजचे संचालन आणि व्यवस्थापन | 01 | 03.07.2026, 11:00 वा. |
| 11 | थिविम, करमळी येथे एफओबीवर जाहिरात फलकांद्वारे रेल्वे स्थानकांवर जाहिरात | 02 | 04.07.2026, 11:00 वा. |
| 12 | माणगाव, खेड, चिपळूण, कुंडापुरा, मूकांबिका रोड बैंदूर, थिविम, थिविम-2, उडुपी, कारवार, करमळी,कणकवली येथे पे अँड यूज शौचालय सुविधा | 11 | 04.07.2026, 11:00 वा. |
| 13 | करमळी येथे स्थानक परिसरात व्हिडिओ स्क्रीनद्वारे वाणिज्यिक प्रचार | 01 | 06.07.2026, 11:00 वा. |
| 14 | मडगाव येथे कंपाउंड बाउंड्री वॉल आणि होर्डिंगवर जाहिरात | 02 | 07.07.2026, 11:00 वा. |

**चौकशीसाठी कृपया संपर्क साधा** : 1. श्री प्रवीण डावरे, मो. क्र. 9004470597 2. श्री विनय गावंकर, मो. क्र. 9004476129, 3. श्री मधुकुमार शेट्टी, मो. क्र. 9004476082 अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** ही वेबसाइट पाहावी.

## पनवेल महानगरपालिका

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | अधिक्षक, तळोजा मध्यवर्ती कारागृह, खारघर नवी मुंबई | ०१ आवळा, ०१ बदाम, ०१ बोर, ०१ जांभूळ, ०५ आंबा, ०१ वड, ०२ सिंगापुर चेरी, ०१ गुलमोहर व ०६ सुबाभुळ अशी एकूण १९ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळोजा मध्यवर्ती कारागृह, खारघर, नवी मुंबई येथे भूखंडाच्या आवारातील १९ झाडे तळोजा कारागृहातील कर्मचारी वसतीगृहाचे बांधकाम करणेस बाधित होत आहे. |
| २. | अधिक्षक, तळोजा मध्यवर्ती कारागृह, खारघर नवी मुंबई | ०२ आवळा, ०२ बदाम, ०३ बोर, ०२ बहवा, ०१ जांभूळ, ०१ कांचन, ०१ करंज, ०१ काटेसावर, ०२ आंबा, ०३ सिंगापुर चेरी, ०१ उंबर व ०१ वड अशी एकूण २० झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळोजा मध्यवर्ती कारागृह, खारघर, नवी मुंबई येथे भूखंडाच्या आवारातील २० झाडे तळोजा कारागृहातील कर्मचारी वसतीगृहाचे बांधकाम करणेस बाधित होत आहे. |
| ३. | अधिक्षक, तळोजा मध्यवर्ती कारागृह, खारघर नवी मुंबई | ०३ बदाम, ०२ जांभूळ, ०१ जंगली उंबर, ०६ आंबा, ०१ निम, ०१ सिंगापुर चेरी, ०४ उंबर व ०२ विलायती चिंच अशी एकूण २० झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळोजा मध्यवर्ती कारागृह, खारघर, नवी मुंबई येथे भूखंडाच्या आवारातील २० झाडे तळोजा कारागृहातील कर्मचारी वसतीगृहाचे बांधकाम करणेस बाधित होत आहे. |
| ४ | कार्यकारी अभियंता, पनवेल महानगरपालिका. | ०१ आंबा, ०१ अशोका, ०१ बदाम, ०१ उंबर. ०१ रेन ट्री व ०२ जंगली अशी एकूण ०७ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड तक्का अंडरपास ते नॅशनल पॅराडाईज येथे सर्विस रोड बांधकामात ०७ झाडे बाधित होत करणेस बाधित होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/पुनर्रोपण करणेस परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही /-
**उपायुक्त**
**तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र-PMC-PARK/271/2026-PTAD

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ**
**विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, रा.प. रायगड विभाग, रामवाडी, पेण.**
e-mail-dest_raigad@rediffmail.com
दूरध्वनी क्र.८२७५०६६४००

क्र. राप/रायगड/वाह/वाणिज्य/ ५५५ दिनांक : २२/०६/२०२६

**स्वारस्य अभिव्यक्ती सुचना क्र. ०१/२०२६**

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रायगड विभाग, पेण-रामवाडी हे या विभागामार्फत मुंबई गोवा व गोवा-मुंबई या राष्ट्रीय/राज्य महामार्गावरील खारपाडा ते कशेडी व कशेडी ते खारपाडा या हद्दीतील हॉटेल मोटेलच्या ठिकाणी ई-शिवाई बसेसना अधिकृत थांबा देण्याबाबत विचाराधीन आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मार्गाचे नाव | ई शिवाई फेरीकरिता किमान अपेक्षित थांबा आकार रक्कम (प्रतिबस प्रतिदिन प्रमाणे) | थांबा आकार रक्कमेवर वस्तु व सेवाकर | प्रस्ताव सादर करताना भरणा करावयाची बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मुंबई - गोवा | रू. ३१०/- | प्रत्येकी १८ टक्के | रू.१,००,०००/- |
| २. | गोवा - मुंबई | रू. ३१०/- | प्रत्येकी १८ टक्के | रू.१,००,०००/- |

अधिकृत हॉटेल थांब्यासाठी उपरोक्त प्रमाणे प्रतिदिन प्रतिबस/प्रतिफेरी किमान अपेक्षित देकार रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने अपेक्षित किंवा त्यापेक्षा थांबा देकार रक्कम देऊ करणाऱ्या हॉटेल चालक मालक यांनी सदरची रक्कम स्वारस्य अभिव्यक्ती सुचना निविदा प्रपत्रात नमुद करून सदरचे निविदा प्रपत्र हॉटेल प्रस्तावासोबत सादर करण्यात यावेत.

निविदा प्रपत्राचे फॉर्म, अटी व शर्ती फॉर्म तसेस प्रस्तावाच्या सोबत आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी इत्यादी तपशिल विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रायगड, पेण रामवाडी येथे दि. २३.०६.२०२६ ते दि.१४.०७.२०२६ या कालावधीत दररोज शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस सोडून इतर दिवशी १०.३० ते १५.०० या वेळेत हॉटेल थांबा प्रस्ताव सादर करणेकरीता रू. २०००/- + १८% वस्तु व सेवाकर असे एकूण रू.२,३६० /- परतावा केला जाणार नाही. व बयाणा रक्कम रू.१,००,०००/- या कार्यालयाकडे भरणा केले नंतर आपणांस निविदा प्रपत्र फॉर्म मिळतील. दि. १४.०७.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत निविदा प्रपत्र फॉर्म व बयाणा रक्कम स्विकारणेत येईल. दि. १४.०७.२०२६ रोजी १५.०० वाजल्या नंतर निविदा फॉर्म दिले जाणार नाहीत, तसेच बयाणा रक्कम स्विकारली जाणार नाही.

हॉटेल प्रस्ताव स्विकारण्याची शेवटची दिनांक १५.०७.२०२६ रोजी १४.०० वाजेपर्यंत राहील व निविदा प्रपत्र पेटी सिल केल्यानंतर उशिरा प्राप्त झालेले प्रस्ताव निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येतील. अपूर्ण नोंदी असलेल्या, स्वाक्षरी नसलेल्या व आवश्यक मुळ कागदपत्रे निविदा सोबत न जोडल्यास निविदा अपात्र समजण्यात येईल. निविदा शक्यतो दि. १५.०७.२०२६ रोजी १५.३० वाजे पर्यंत उघडण्यात येतील.

सही/-
**विभाग नियंत्रक,**
**रा.प.रायगड विभाग, पेण**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील नमूद केलेल्या जमिन मिळकती विद्यमान मालकांच्या मालकीच्या असून सदर जमिन मिळकती आमचे अशिलांनी खरेदी करण्याच्या ठरविल्या आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र | मालकांचे नांव | मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | सौ. राजेश्री राजेंद्र शिवलकर | कोलमांडला ता.मुरुड, जि.रायगड | ११३ | ०-४५-०० | १२.०० |
| २. | श्री.राजेंद्र गोविंद शिवलकर | | ११४ | ०-९७-२०<br>पो.ख. ०-०४-८०<br>एकूण १-०२-००<br>पैकी ०-५२-०० | २३.१७ |
| ३. | १.श्रीमती शलाका रनजीत म्हात्रे<br>२.श्रीमती शितल देवेंद्र पेडणेकर | | ११४ | ०-९७-२०<br>पो.ख. ०-०४-८०<br>एकूण १-०२-००<br>पैकी ०-५०-०० | |

**सदर जमिन मिळकती या नोटीसीचा विषय आहेत.**

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असून त्या विकणेचा त्यास हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या निरंतरचा हक्क, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज, वारसाहक्क, दान, लिएन, चार्ज, पोटगी अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत तक्रारी अथवा हरकती न आल्यास वरील मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यांच्यावर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असून ही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिलेला आहे, असे गृहित धरुन माझे अशिल व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक :२२/०६/२०२६

**ॲड. गीता सं.पवार**
०५, श्रुती सारंग सहकारी सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हण आळी,
ता.अलिबाग, जि.रायगड

## निवडक

### ‘कारमेल’कडून शिक्षण विभागालाच केराची टोपली?

**पेण :** कारमेल हायस्कूल प्रशासनाच्या कारभाराबाबत पालक आणि विद्यार्थ्यांकडून वारंवार तक्रारी होत असतानाच आता शाळा प्रशासनाने थेट शिक्षण विभागाच्या नोटीसलाच प्रतिसाद न दिल्याने नवीन वाद निर्माण झाला आहे. त्यामुळे शिक्षण विभागाच्या आदेशांना शाळा प्रशासन गांभीर्याने घेत नसल्याची चर्चा पेणमध्ये रंगू लागली आहे. भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष स्वप्नील म्हात्रे यांनी ९ जून रोजी पेण पंचायत समितीच्या शिक्षण विभागाकडे कारमेल हायस्कूलच्या कारभाराबाबत लेखी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेत गटशिक्षण अधिकारी शर्मिला शेंडे यांनी शाळेच्या मुख्याध्यापकांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. मात्र, संबंधित नोटीस स्वीकारण्यासही शाळा प्रशासनाने टाळाटाळ केल्याचे समोर आले आहे. त्यानंतर शिक्षण विभागाने सदर नोटीस ई-मेलद्वारे पाठविली. तरीदेखील आजपर्यंत शाळा प्रशासनाकडून कोणतेही स्पष्टीकरण किंवा उत्तर प्राप्त झाले नसल्याची माहिती मिळत आहे. यामुळे शिक्षण विभागाच्या अधिकृत नोटीसलाच कारमेल हायस्कूल प्रशासनाने केराची टोपली दाखवल्याचा आरोप होत असून, प्रशासकीय यंत्रणेच्या अधिकारालाच आव्हान दिले जात असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

### दिबा पाटलांच्या नावासाठी २४ जूनला निर्धार सभा

**उरण :** लोकनेते स्वर्गीय दिबा पाटील यांच्या १३ व्या स्मृतिदिनानिमित्त बुधवार, दि. २४ जून २०२६ रोजी जासई येथील स्मृतीस्थळी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी दिबा पाटील यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू असल्याने या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला राष्ट्रीय लोकनेते दिबा पाटील यांचे नाव देण्याची मागणी अनेक वर्षांपासून सुरू आहे. जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने या मागणीला अधिक बळ देण्यासाठी आणि दिबा साहेबांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिकांनी जासई येथे उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. दि. २४ जून रोजी सकाळी ११ वाजता जासई येथील दिबा पाटील स्मृतीस्थळी अभिवादन कार्यक्रम होणार असून, रायगड, नवी मुंबई, उरण, पनवेल, ठाणे तसेच परिसरातील विविध भागांतील कार्यकर्ते, ग्रामस्थ, शेतकरी, प्रकल्पग्रस्त आणि दिबा साहेबांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.दरम्यान, खासदार सुरेश (बाळ्यामामा) म्हात्रे हे सकाळी ९ वाजता भिवंडी येथून ठाणे-बेलापूरमार्गे १५० हून अधिक वाहनांच्या ताफ्यासह जासईकडे रवाना होणार आहेत.

### वरुणराजासाठी भीमेश्वराला गाऱ्हाणे

**चौल :** यंदा मान्सूनच्या आगमनास झालेला विलंब, कमी झालेला पाऊस आणि उष्ण व दमट वातावरणामुळे शेतकरी, बागायतदार आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पावसाअभावी शेतीच्या कामांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, अनेक भागांत वरुणराजाकडे आशेने डोळे लागले आहेत. या पार्श्वभूमीवर श्रीराम भक्त मंडळ, खालची आळी आणि श्री भीमेश्वर देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने भीमेश्वर मंदिरात विशेष संततधार अनुष्ठानाचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक कार्यक्रम मंगळवार, दि. २३ जून रोजी सूर्योदय ते सूर्यास्त या कालावधीत पार पडणार आहे. कार्यक्रमादरम्यान भगवान महादेवाची विशेष पूजा, रुद्रपठण, रुद्रजप तसेच ‘ॐ नमः शिवाय’ मंत्राचा अखंड जप करण्यात येणार आहे. वरुणराजाने कृपादृष्टी करून समाधानकारक पाऊस पाडावा, शेतकऱ्यांच्या आशा-अपेक्षा पूर्ण व्हाव्यात आणि सर्वत्र सुख-समृद्धी नांदावी, या उद्देशाने हे अनुष्ठान आयोजित करण्यात आले आहे. या धार्मिक उपक्रमात परिसरातील अनेक भाविक, ग्रामस्थ आणि शिवभक्त सहभागी होण्याची शक्यता आहे. आयोजकांच्या वतीने सर्व भाविकांना या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले असून, सामूहिक प्रार्थना आणि मंत्रजपातून निसर्ग कृपेची याचना केली जाणार आहे. वरुणराजाने लवकरच कृपावर्षाव करावा, अशीच यावेळी प्रार्थना करणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

### स्वाधार योजनेच्या अर्जातील त्रुटी पूर्ततेसाठी मुदतवाढ

**अलिबाग :** सन २०२४-२५ व २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेतील केलेल्या अर्जातील त्रुटी पूर्ततेसाठी ७ जुलै २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली असून, संबंधित सर्व विद्यार्थ्यांनी त्रुटी पूर्तता ऑनलाईन तसेच ऑफलाईन करावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सुनील जाधव यांनी केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून या योजनेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संकेतस्थळावर स्विकारण्यात येत आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय नियमात महत्त्वाचा बदल करत आला आहे. चालू शैक्षणिक वर्षापासून या योजनेचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रथम शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेशासाठी अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे.गुणवत्तेनुसार किंवा जागेअभावी ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळणार नाही. त्यांनाच स्वाधार योजनेसाठी पात्र ठरवले जाईल. मात्र, जे विद्यार्थी वसतिगृहासाठी अर्जच करणार नाहीत, ते दोन्ही योजनांपासून वंचित राहतील.

### घेरावाडी प्रथमच वीजप्रकाशाने उजळली

**पनवेल :** तालुक्यातील आपटा ग्रामपंचायत हद्दीतील आणि कर्नाळा किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेल्या दुर्गम घेरावाडी या आदिवासी वाडीला अखेर वीजपुरवठा उपलब्ध झाला आहे. चारही बाजूंनी दाट जंगलाने वेढलेल्या या डोंगराळ भागात प्रथमच वीज पोहोचल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. महावितरणच्या वतीने राबविण्यात आलेल्या या विद्युतिकरण प्रकल्पांतर्गत ३२ उच्चदाब पोल, १६ लघुदाब पोल आणि एक रोहित्र उभारण्यात आले. या माध्यमातून घेरावाडीतील सर्व कुटुंबांना नवीन वीजजोडण्या देण्यात आल्या. आ. महेश बालदी यांच्या हस्ते ग्रामस्थांना वीजजोडण्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पंचायत समिती अध्यक्षा रंजना वास्कर, महावितरणचे अधिकारी व स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. दुर्गम आणि आव्हानात्मक भौगोलिक परिस्थितीत हे काम यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल आ. बालदी यांनी महावितरणच्या अधिकारी, कर्मचारी आणि संबंधित ठेकेदारांचे कौतुक केले. महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झालेल्या या प्रकल्पामुळे घेरावाडी अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करू लागली असून शिक्षण, दळणवळण आणि दैनंदिन जीवनमान उंचावण्यास मोठी मदत होणार आहे.

# आदिवासी बांधवांचा एल्गार



## आमची वहिवाटीची जमीन आमच्या नावावर करा!

## 150 एकर दळी जमिनीवर हक्कासाठी लढा तीव्र करण्याचा निर्धार

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील पाली तर्फे कोतवाल खलाटी ग्रामपंचायत हद्दीतील साई डोंगर परिसरातील तब्बल १५० एकर दळी वन जमिनीवर अनेक वर्षांपासून वहिवाट असतानाही वन हक्क कायद्यांतर्गत जमीन मिळाली नसल्याने आदिवासी ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. ‘‘आमची वहिवाटीची जमीन आमच्या नावावर करा’’ अशी ठाम मागणी करत पाली कातकरी वाडी, आंब्याची वाडी आणि मोहमाळ वाडी येथील ग्रामस्थांनी हक्काच्या जमिनीसाठी लढा अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

सध्या साई डोंगर परिसरात टोरंट वीज निर्मिती कंपनीचा जलविद्युत प्रकल्प उभारला जात असून, ज्या जमिनीवर पिढ्यान् पिढ्या आदिवासी समाजाची वहिवाट आहे, त्याच जमिनीवरील हक्क अद्याप मान्य करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे जमीन आणि रोजगार दोन्ही हिरावले जाण्याची भीती स्थानिक आदिवासी बांधवांनी व्यक्त केली आहे.पाली तर्फे कोतवाल खलाटी ही ग्रामपंचायत काही वर्षांपूर्वी अस्तित्वात आली. यापूर्वी हा परिसर पोटल ग्रामपंचायतीच्या हद्दीत होता. यापूर्वी मोहमाळ वाडी आणि आंब्याची वाडी येथील काही आदिवासी कुटुंबांना सर्वे क्रमांक २२ मधील ३५ एकर जमीन वन हक्क कायद्यांतर्गत मंजूर करण्यात आली होती. त्या जमिनीवर आंबा लागवड, भाजीपाला शेती तसेच विविध पिकांचे उत्पादन घेऊन अनेक कुटुंबे आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत. दळी भूखंडातील २४ आदिवासींना वन हक्क कायद्यांतर्गत जमीन मिळाल्यानंतर त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल झाल्याचे दिसून येत आहे.

मात्र, याच परिसरातील १५० एकर दळी जमीन अद्याप वन हक्क कायद्यांतर्गत मंजूर करण्यात आलेली नाही. या जमिनीवर पाली कातकरी वाडी, आंब्याची वाडी आणि मोहमाळ वाडी येथील शेकडो आदिवासी कुटुंबांची वहिवाट असून, ते पावसाळ्यात भाजीपाला, नागली, वरी यांसारख्या पिकांची लागवड करून उदरनिर्वाह करतात.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, आंब्याची वाडीतील ५५ कुटुंबे, मोहमाळ वाडीतील २२ कुटुंबे आणि पाली कातकरी वाडीतील ३५ कुटुंबे या जमिनीवर अवलंबून आहेत. त्यामुळे वन हक्क कायद्यांतर्गत या सर्व कुटुंबांना जमिनीचे पट्टे देण्यात यावेत, अशी मागणी जोर धरत आहे.दरम्यान, साई डोंगर परिसरात सुरू असलेल्या टोरंट प्रकल्पामुळे आदिवासींच्या पारंपरिक हक्कांवर गदा येत असल्याची भावना स्थानिकांमध्ये निर्माण झाली आहे. ‘‘ज्या जमिनीवर आमच्या पिढ्या शेती करत आल्या, त्या जमिनीवरील हक्क आम्हाला नाकारले जात आहेत. आमच्या वहिवाटीच्या जमिनी आमच्या नावावर झाल्याच पाहिजेत,’’ अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. या संदर्भात एकत्रित ग्रामपंचायतीचे माजी सदस्य हरी जाधव यांनीही तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ‘‘ही जमीन स्थानिक आदिवासींची असून त्यांचा त्यावर नैसर्गिक आणि कायदेशीर हक्क आहे. शासनाने तातडीने या जमिनी वन हक्क कायद्यांतर्गत मंजूर कराव्यात,’’ अशी मागणी त्यांनी केली.

वन हक्कासाठीचा हा लढा आता अधिक संघटित आणि तीव्र करण्याचा निर्धार तिन्ही वाड्यांतील आदिवासी ग्रामस्थांनी व्यक्त केला असून, शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचे संकेतही देण्यात आले आहेत.

## ‘शार्लोट लेकच्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाका’

**| नेरळ | प्रतिनिधी |**



माथेरान शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या शार्लोट लेक संवर्धन प्रकल्पातील गाळ काढण्याचे काम निविदेप्रमाणे पूर्ण झाले नसल्याचा आरोप करत संबंधित ठेकेदारावर कारवाई करून त्याला काळ्या यादीत टाकण्याची मागणी माथेरानचे माजी नगराध्यक्ष, स्वीकृत सदस्य तथा शिवसेना शहरप्रमुख मनोज खेडकर यांनी केली आहे.

केंद्र शासनाच्या अमृत-२ योजनेअंतर्गत सुमारे पाच कोटी रुपयांच्या निधीतून शार्लोट लेक संवर्धनाचे काम सुरू आहे. निविदेनुसार तलावातील सुमारे २ हजार ट्रक गाळ काढून तो दोन किलोमीटर अंतरावर वाहून नेणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात अत्यल्प गाळ काढण्यात आला असून, बहुतांश गाळ तलावातच असल्याचा दावा खेडकर यांनी केला आहे.

तलावातील गाळ भविष्यात माथेरानमधील पारंपरिक लाल मातीच्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी उपयोगी पडू शकतो. त्यामुळे मौल्यवान माती नदीत सोडण्याऐवजी नियोजनबद्ध पद्धतीने साठवून ठेवावी, अशी मागणीही त्यांनी केली.

दरम्यान, शार्लोट लेकमधील गाळ नदीत वाहून गेल्यास मोरबे धरणाच्या जलसाठ्यावरही परिणाम होऊ शकतो, असा इशारा देत पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीनेही कामाची सखोल चौकशी करण्याची मागणी मनोज खेडकर यांनी केली आहे. निविदेतील अटींचे पालन न झाल्यास संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली.

## पात्र लाभार्थ्यांसाठी अनुदान वितरणाची कार्यवाही

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

कृषी विभागामार्फत राज्यात राबविण्यात येणाऱ्या कृषी यांत्रिकीकरण योजनांतील पात्र लाभार्थ्यांना अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक निधी उपलब्ध करण्यात आला असून, अनुदान वितरणाची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती कृषी आयुक्तालय, पुणे अंतर्गत कृषी अभियांत्रिकी संचालनालयाचे कृषी संचालक अंकुश माने यांनी दिली आहे.

कृषी विभागामार्फत महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उपअभियान, राष्ट्रीय कृषी विकास योजना-अंतर्गत कृषी यांत्रिकीकरण तसेच राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांअंतर्गत ट्रॅक्टर, पॉवर टिलर, स्वयंचलित यंत्रे, ट्रॅक्टरचलित अवजारे, पीक काढणीनंतरची अवजारे, प्राथमिक प्रक्रिया अवजारे, पीक संरक्षण अवजारे तसेच भाडेतत्त्वावरील सेवा सुविधा केंद्रे उभारण्यासाठी अनुदानाचा लाभ देण्यात येतो. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात या तीनही योजनांसाठी एकूण रु. २६३.७२ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे.

## ‘अमृत’चे कर्मचारी प्रशिक्षण शिबीर संपन्न

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

दि.१४ ते १८ जून या कालावधीत औंध येथील अमृतच्या मुख्यालयात पाच दिवसीय कर्मचारी प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले. या निवासी प्रशिक्षण शिबिरात राज्यातील विविध जिल्ह्यांतील अमृत व्यवस्थापक, अमृत मित्र आणि अमृत सखी सहभागी झाले होते. समाजातील सर्व घटकांची उन्नती करणे हे शासनाचे कर्तव्य असून, कोणताही वर्ग विकासापासून वंचित राहिल्यास संपूर्ण समाज दुर्बळ होतो. समाजाच्या उन्नतीबरोबरच चारित्र्यनिर्माणालाही तितकेच महत्त्व आहे.

## आज पालिकेची सर्वसाधारण महासभा

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा मंगळवार, दि. २३ जून रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे. ही सभा महापालिकेच्या आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे होणार असून, विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा व निर्णय अपेक्षित आहेत. महासभेच्या विषयपत्रिकेनुसार शहर विकास, प्रशासकीय कामकाज, आर्थिक मंजुरी तसेच विविध विकासकामांशी संबंधित प्रस्ताव सभेपुढे ठेवण्यात येणार आहेत. त्यामुळे या सभेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ‘व्यासांचे महाभारत’ नवी दिशा देणारी कादंबरी

### शंकराचार्य स्वामी वासुदेवानंद सरस्वती



**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

ज्येष्ठ साहित्यिक कांतीलाल कडू लिखित ‘व्यासांचे महाभारत’ या कादंबरीचे प्रकाशन ज्योतिष मठाचे शंकराचार्य तथा अयोध्या श्रीराम मंदिर न्यास समितीचे पदाधिकारी स्वामी वासुदेवानंद सरस्वती यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी बोलताना स्वामींनी ही कादंबरी समाजाला नवी दिशा देणारी आणि वैचारिकतेचा खजिना ठरणारी कलाकृती असल्याचे गौरवोद्‌गार काढले. ज्येष्ठ साहित्यिक तथा ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यास पद्मश्री पद्मजा फेणाणी-जोगळेकर, कविवर्य प्रा. अशोक बागवे, महाराष्ट्र रिसर्च सेंटरचे संपादक महेश म्हात्रे आणि लेखक कांतीलाल कडू यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला साहित्यप्रेमी आणि कडू यांचे चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वामी वासुदेवानंद सरस्वती यांनी महाभारत ही केवळ ऐतिहासिक घटना नसून सामाजिक शिक्षणाचे आणि जीवनमूल्यांचे प्रेरणास्थान असल्याचे सांगितले.

## क्रीडा संकुलात बेकायदेशीर बोरवेलचा डाव उधळला



### नगराध्यक्षा भावना घाणेकर यांची धडक; दोषींवर फौजदारी गुन्ह्याची मागणी

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण नगर परिषदेच्या मालकीच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुलात सुट्टीच्या दिवशी म्हणजे रविवारी बेकायदेशीर बोरवेल खोदकामाचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. नगर परिषदेची कोणतीही परवानगी नसताना सार्वजनिक मालमत्तेवर सर्रासपणे खोदकाम सुरू असल्याचे समोर येताच नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी घटनास्थळी धाव घेत हा प्रकार रंगेहाथ पकडला.

क्रीडा संकुलातील जलतरण तलावासाठी पाण्याची गरज असल्याचे कारण पुढे करून हा प्रकार करण्यात येत होता. मात्र, नगर परिषदेची लेखी परवानगी नसताना थेट बोरवेल खोदण्याचे धाडस नेमके कोणाच्या आशीर्वादाने करण्यात आले, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी मुख्याधिकारी जीवन पाटील आणि कार्यालय अधीक्षक राजेंद्र घाडगे यांच्याकडे याबाबत विचारणा केली असता, अशा कोणत्याही कामासाठी नगर परिषदेने परवानगी दिलेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यानंतर प्रशासनाने तातडीने कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली. घटनास्थळी पाहणीदरम्यान एमएच-०६ बीक्यू-९११० या वाहनाद्वारे बोरवेल खोदकाम सुरू असल्याचे निदर्शनास आले. विशेष म्हणजे शनिवार-रविवारच्या सुट्टीचा आणि वरिष्ठ अधिकारी शहराबाहेर असल्याचा गैरफायदा घेत हे खोदकाम चोरट्या पद्धतीने सुरू करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे हा प्रकार पूर्वनियोजित होता का, याबाबतही संशय व्यक्त केला जात आहे.

नगर परिषदेच्या मालकीच्या जागेत बेकायदेशीरपणे घुसखोरी करून मनमानी करणाऱ्यांना कोणतीही माफी दिली जाणार नाही. क्रीडा संकुलाच्या ठेकेदाराकडे लाखो रुपयांची थकबाकी असताना आणि मुदतवाढ नसताना अशा प्रकारचे काम करणे म्हणजे नगर परिषदेच्या अधिकारालाच आव्हान देण्याचा प्रकार आहे. संबंधितांवर तात्काळ फौजदारी कारवाई झालीच पाहिजे,’’ असे नगराध्यक्षा घाणेकर म्हणाल्या.

## रायगडच्या चौघांना राज्यस्तरीय गुणवंत कामगार पुरस्कार

**| चौल | प्रतिनिधी |**



रायगड जिल्ह्यातील चार गुणवंत कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे सन २०२४ चा कामगार भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. सन्मानचिन्ह व २५ हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्कारासाठी निवड झालेल्यांमध्ये प्रमोद दत्तू पाटील, उमेश वसंत कांबळे, संतोष रामा मोरे आणि नितीन मुरली राव यांचा समावेश आहे.

प्रमोद पाटील हे रासायनिक उद्योग क्षेत्रातील अनुभवी कर्मचारी असून, कामगार संघटना, सामाजिक संस्था आणि सहकारी क्षेत्रात सक्रिय आहेत. उमेश कांबळे यांनी उद्योगातील गुणवत्ता सुधारणा, नवोपक्रम योजना तसेच कामगार कल्याण उपक्रमांमध्ये उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांनी विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांतही सहभाग नोंदविला आहे.

संतोष मोरे हे महाड औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असून आपत्ती व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. त्यांनी पूरग्रस्त व गरजू नागरिकांना मदत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत.

नितीन राव हे अग्निसुरक्षा आणि औद्योगिक सुरक्षा क्षेत्रातील तज्ज्ञ असून, विविध उद्योगांमध्ये सुरक्षा व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळत आहेत. समाजोपयोगी उपक्रम, रक्तदान आणि शैक्षणिक मदतीत त्यांचा सहभाग उल्लेखनीय आहे.

या चौघांच्या निवडीमुळे रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून, विविध सामाजिक, औद्योगिक आणि कामगार संघटनांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

विशेष म्हणजे, या चौघांनी आपल्या-आपल्या कार्यक्षेत्रात केवळ व्यावसायिक जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या नाहीत, तर कामगार हित, सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन, आपत्ती व्यवस्थापन, शिक्षण आणि जनकल्याणाच्या विविध उपक्रमांमध्ये उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने त्यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड केली आहे.

### चौल-रेवदंड्यातील सायकलस्वारांची ऐतिहासिक कामगिरी | २३५ किमी अंतर एका दिवसात पार करत गाठले पंढरपूर

## विठ्ठलनामाचा गजर अन् सायकलवारीचा थरार!

**| चौल | प्रतिनिधी |**




वारी म्हणजे श्रद्धा, भक्ती आणि समर्पणाचा महामेळा... पण याच वारीला साहस, जिद्द आणि फिटनेसची जोड देत रेवदंडा कोस्टल पेलोटन सायकलिंग क्लबच्या पाच सायकलवीरांनी एक ऐतिहासिक पराक्रम गाजवला आहे. इंडियन ॲथलेटिक सोसायटी आयोजित दहाव्या पुणे-पंढरपूर सायकलवारी २०२६ मध्ये सहभागी होत त्यांनी देहू-आळंदी ते पंढरपूर हे तब्बल २३५ किलोमीटरचे अंतर एका दिवसात पूर्ण केले. विशेष म्हणजे, रेवदंडा परिसरातून सायकलवरून पुणे-पंढरपूर वारी यशस्वीपणे पूर्ण करणारे हे पहिलेच मानकरी ठरले असून, त्यांच्या या कामगिरीने संपूर्ण रेवदंडा-चौल परिसराचा मान उंचावला आहे.

या सायकल वारीत शेतकरी कामगार पक्षाचे रेवदंडा शहर चिटणीस निलेश खोत, मिलिंद वैती, संदीप मोरे, रायगड डाक विभागाचे अधीक्षक सुनील थळकर आणि चौलमळा गावचे गावप्रमुख रवींद्र घरत यांनी सहभाग घेतला होता. विठ्ठलाच्या नामस्मरणात, हजारो वारकऱ्यांच्या उत्साहात या सायकलस्वारांनी अवघड वाटचाल पूर्ण केली.

वारीदरम्यान मिलिंद वैती आणि सोनाली वैती यांनी सपोर्ट व्हेईकलसह संपूर्ण प्रवासात सायकलस्वारांना मोलाची साथ दिली. आवश्यक तेथे मदत, मार्गदर्शन आणि सुरक्षिततेची जबाबदारी सांभाळत त्यांनी या मोहिमेच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावली. वारीसाठी रवाना होण्यापूर्वी रेवदंडा ग्रामपंचायतीचे उपसरपंच संतोष मोरे यांनी नारळ वाढवून सायकलस्वारांना शुभेच्छा दिल्या. यावेळी संदीप खोत, सुदेश माळी, अरुण विचारे, राकेश मुकादम, समीर वर्तक आणि सुरेश खोत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. विठ्ठलभक्ती, साहस, शिस्त आणि सामाजिक एकोप्याचा अनोखा संगम घडवणारी ही सायकल वारी रेवदंडा-चौल परिसरासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

> “पुणे-पंढरपूर सायकल वारी हा आमच्यासाठी केवळ सायकलिंगचा प्रवास नव्हता, तर तो श्रद्धा, जिद्द आणि आत्मविश्वासाचा एक अविस्मरणीय अनुभव होता. रेवदंडा परिसरातून अशी वारी पूर्ण करणारे पहिले सायकलस्वार असल्याचा आम्हाला अभिमान आहे. या यशामागे आमच्या सर्व सहकाऱ्यांची मेहनत, कुटुंबीयांचे पाठबळ आणि सपोर्ट टीमचे मोलाचे सहकार्य आहे. भविष्यात अधिकाधिक युवकांनी सायकलिंगकडे वळावे आणि आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारावी, हाच आमचा प्रयत्न राहील.”
> – **निलेश खोत** (सायकलस्वार)

# सत्तेसाठी जगतो आम्ही

शिवसेनेच्या सहा खासदारांनी शिंदे गटात प्रवेश केला. त्यावेळी सत्तेसाठीच जगतो आम्ही असे सूत्र त्यांनी जणू सांगून टाकले. ओमराजे निंबाळकर यांचे वडील पवनराजे निंबाळकर यांची अनेक वर्षांपूर्वी हत्या झाली होती. चुलतबंधू पद्मसिंह पाटील यांच्यावर आरोप होता. त्यातूनच राष्ट्रवादीचे पद्मसिंह विरुध्द शिवसेनेचे ओमराजे असे शत्रुत्व धाराशिवमध्ये निर्माण झाले. ओमराजे यांना सेनेने कायम मदत केली. या खटल्याचा निकाल खरे तर आधीच लागायला हवा होता. पण तो अगदी सोळा तारखेला देखील ऐन मोक्यावर पुढे ढकलण्यात आला. ओमराजे म्हणाले मी शिंदे गटात जायचे की नाही यावर निकाल लागल्यावर बोलेन. निकाल विरोधात गेला. पद्मसिंह यांच्यासह सगळे आरोपी निर्दोष सुटले. ओमराजेंना हा जबर धक्का आहे. मधल्या काळात पद्मसिंह आणि त्यांचे पुत्र राणा जगजितसिंग हे भाजपच्या कळपात दाखल झालेले आहेत. त्यांच्याविरुध्द अपील झाले तरीही सरकार ते किती तळमळीने लढवेल हे दिसते आहेच. अशा स्थितीत ओमराजे सरकारच्या बाजूला जातील का याविषयी शंका होती. त्यांनीही दोन दिवस जनतेशी चर्चा करतो वगैरे नाटक केले. जणू काही जनता यांच्या कानात येऊन सांगते व तिच्या म्हणण्यानुसारच वागतात. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत जनतेने तब्बल तीन लाखांचे मताधिक्य यांना दिले आणि ठाकरे तसेच महाविकास आघाडीसोबत राहण्याचा कौल दिला. त्याला केवळ दोनच वर्षे झाली आहेत. तरीही आपली कामे होत नाहीत म्हणून राजे कासावीस झाले. कामे व्हायला हवीत म्हणून शेवटी आपण शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या शिवसेनेत जात असल्याचे त्यांनी जाहीर केले. साधी बदलीसुध्दा आपण करू शकत नव्हतो, निधी मिळत नव्हता अशा तक्रारी त्यांनी मांडल्या. याचा साधा अर्थ असा होतो की, ज्या शिंदे गटात वा भाजप आघाडीमध्ये ते आता जाणार आहेत ते लोक अत्यंत खुनशी, पक्षपाती व सूडाने वागणारे आहेत. विरोधी आमदारांची कोणतीही कामे होऊ द्यायची नाहीत असे ते अगदी ठरवून वागतात. ओमराजे किंवा बाकीच्यांना आपल्या बाजूला येण्यासाठी ते त्यांची अडवणूक करतात. ब्लॅकमेलिंग करून पक्ष बदलण्यास भाग पाडतात.

## भाजपच्या खुनशीपणाची कबुली

आता ओमराजे आणि तमाम खासदार इकडे आल्यानंतर त्यांचे तमाम सगळे प्रश्न सुटणार आहेत. त्यांच्या मतदारसंघात स्वर्ग अवतरणार आहे. सत्ता असल्याखेरीज आपली कामे होत नाहीत ही काही नवी सबब नाही. यापूर्वीही सेना व राष्ट्रवादीचे आमदार फुटले तेव्हा तेव्हा त्यांनी ती सांगितली होती. एका अर्थाने हा सर्व दोष मतदारांवर वा जनतेवर टाकण्याचा हा प्रकार आहे. काय करणार, जनतेला विकास हवा आहे, त्यामुळे आम्हाला नाइलाजाने पार्टी बदलून सत्तेत जावे लागत आहे, असा आव ही मंडळी आणत असतात. तो तद्दन लबाडपणाचा व जनतेवर अन्याय करणारा आहे. विकास ही खासदार किंवा आमदारांनी करण्यासारखी गोष्ट नाही. तो सरकारने करायचा असतो. रस्ते किंवा पाटबंधारे किंवा उद्योग यांचा विकास कुठे कशा प्रकारे करायचा याचा एकत्रित आराखडा केवळ सरकारच बनवू शकते. हा आराखडा वास्तवात उतरताना आमदार व खासदार जोर लावू शकतात, पाठपुरावा करू शकतात, कामावर नजर ठेवू शकतात. इतकी वर्षे काँग्रेसची सत्ता होती. त्यावेळी शेकाप, कम्युनिस्ट, जनसंघ अशा विविध विचारधारांचे लोक अनेक वर्षे एकेका मतदारसंघातून निवडून आले. पण त्यांना कधी अडचणी आल्या नाहीत. त्यांच्या परिसराचा विकास थांबला नाही. भाजपचे गोपीनाथ मुंडे, नितीन गडकरी यांच्यासारखे नेते सत्तारुढ काँग्रेसवर कायम टोकाची टीका करीत. तरीही त्यांना निधीची अडचण आली नाही किंवा बदल्या होत नाहीत असे म्हणून रडण्याची वेळ त्यांच्यावर आली नाही. याचा अर्थ काँग्रेसवाले अधिक समन्यायी दृष्टीने वागणारे होते. त्यांनी डावेउजवे केले असेल. पण विरोधकांना पूर्ण बरबाद करायचे, त्यांच्या मतदारसंघातून नामशेष करायचे आणि आपल्याकडे यायला भाग पाडायचे असले उद्योग काँग्रेसने केले नाहीत. गणपतराव देशमुख कायमच विरोधी गटात राहिले. पण त्यांची कामे कधीही अडली नाहीत. काँग्रेसी सर्वच मुख्यमंत्र्यांनी त्यांना आदराने वागवले. आजचे मुख्यमंत्री विरोधकांच्या किती आमदारांना असे आदराने वागवतात हा संशोधनाचा विषय आहे. इतरांना सोडा आपल्या पार्टीच्या आमदारांनाही धाकात ठेवणे व देईल तेवढ्यावर समाधान मानायला लावणे असे हे करतात.

## कशाला हव्यात निवडणुका

ओमराजे व त्यांच्यासारख्यांच्या म्हणण्याचा एक अर्थ असाही होतो की निवडणूक म्हणजे जणू आयपीएलचे मसाला सामने आहेत. ते संपले की सगळेच सगळ्यांचे मित्र. विचारसरणी वगैरे केवळ बोलण्यापुरत्या गोष्टी आहेत. एकदा निवडून आले की, सर्व आमदारांनी सर्वाधिक आमदार मिळवून सत्तेत गेला असेल त्या पार्टीत जायचे आणि कामे करून घ्यायच्या मागे लागायचे. निवडणुकीत देवेंद्रांच्या राजकारणावर, भाजपच्या खुनशी व धर्मांध व्यवहारांवर कितीही टीका केली असली तरी ती त्यांनी आणि आपण विसरून जायची. ते सत्तेत गेल्याने त्यांचा हिंदू विरुध्द मुस्लिम असा विद्वेष पसरवण्याचा कार्यक्रम चालू ठेवतील. आपण त्याकडे दुर्लक्ष करायचे. कारण आपल्याला आपले कंत्राटदार सांभाळायचे असतात. त्यांची बिले काढायची असतात. आपल्या मतदारसंघातील लोकांच्या बदल्या हव्या तिथे करून द्यायच्या असतात. धाराशिवमध्ये अमुक एक कारखाना झाला नाही किंवा पाण्याचा प्रश्न सुटला नाही म्हणून मी सत्तेत चाललो असे ओमराजे म्हणत नाहीत. ते वैयक्तिक कामे होत नाहीत अशी यादी सांगतात. म्हणजे जनता व सरकार यांच्या दरम्यानचे दलाल म्हणून आपल्याला वावरायचे आहे असे चित्र त्यांच्या डोळ्यासमोर असते. म्हणजे निवडणुका, प्रचार, टीका वगैरे सर्व गंमत किंवा भातुकलीचा खेळ असतो. तो एकदा आटोपला की झाडून सगळ्यांनी दलालीच्या कामाला जुंपून घ्यायचे असते. ती कामे म्हणजेच जनतेची कामे. यामध्ये भाजपने कितीही अडवणूक केली, इडीच्या वगैरे केसेस लावल्या तरीही ती पार्टी थोर, लोकशाहीवादी. तिचे नेते मोदी हे महान. आपणच आपल्याकडे लहानपणा घेऊन त्यांच्यापाशी जायचे व शांतपणे झोप लागण्याची तरतूद करून घ्यायची. महाराष्ट्रात लोकसभेला जनतेने विरोधकांच्या बाजूने कौल दिला. ४८ पैकी ३१ जागा काँग्रेस आघाडीला मिळाल्या. पण हा कौल आता जनतेच्या विकासाच्या कामांच्या नावाखाली मोडून तोडून खाण्यात आला आहे. शिवसेनेचे फुटले, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे लोक तर आधीपासूनच विलीनीकरणासाठी उत्सुक आहेत. शशिकांत शिंदे, माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील वगैरेंनी पूर्वीच वक्तव्ये करून झाली आहेत. आता पाटील सध्याच्या राजकारणात गप्प आहेत. काल त्यांचे उमेदवार अभयसिंग जगताप यांचा विधानपरिषदेला पराभव झाला. नाशिक वगळता सर्वत्र हेच घडले आहे. त्यामुळे आज ना उद्या राष्ट्रवादीचे खासदार अजितदादांच्या गटामार्फत भाजपला जाऊन मिळणार हे स्पष्ट दिसते आहे. लोकशाही, निवडणुका वगैरे बंद करण्याची वेळ जवळ येत चालली आहे.

---

**विचार**

# करारामगील खेळी

*इराणविरुद्ध सुरू केलेल्या युद्धामागे अमेरिकेचे डीडॉलरायजेशन रोखणे आणि जगातील अधिकाधिक तेलसाठ्यांवर नियंत्रण मिळवणे हे प्रमुख उद्देश होते. इराणबरोबर अमेरिकेने केलेल्या ताज्या करारामुळे हे उद्देश सफल झाल्याचे दिसते. या कराराद्वारे अमेरिकेने चीनच्या वाढत्या शक्तीला आळा घालण्याचा आणि वाटाघाटींमध्ये पाकिस्तानला बरोबर घेऊन भारतावर वचक ठेवण्याचाही अमेरिकेचा प्रयत्न आहे.*



क. अनिल आठल्ये

इराण विरुद्ध अमेरिका आणि इस्राईल या युद्धात अमेरिका आणि इस्राईल यांची उद्दिष्टे भिन्न होती. काहीही करून इराणचा अण्वस्त्र कार्यक्रम थांबवायचा, हे इस्राईलचे उद्दिष्ट होते. इराणकडून हमास, हिज्बुल्लासारख्या दहशतवादी संघटनांना दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहनाला आळा घालण्याचा त्याचा प्रयत्न होता. इराण अण्वस्त्रधारी राष्ट्र बनू नये यात अमेरिकेला नक्कीच रस होता, परंतु इराणच्या एकूण तेल भांडारावर नियंत्रण मिळवण्यात अधिक रस होता. जगातल्या तेलसाठ्यांची स्थिती पाहता व्हेनेझुएला, सौदी अरेबिया, मध्यपूर्वेतली अमेरिकेच्या कच्छपी असलेली राष्ट्रे आणि खुद्द अमेरिका या देशांकडील तेलसाठ्यांवर अमेरिकेचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नियंत्रण आहे. जगातील एकूण तेलसाठ्यांचा विचार करता सुमारे ६० टक्के तेलसाठे अमेरिकेच्या नियंत्रणाखाली आहेत. आता इराणमधील तेलसाठ्यांची जोड मिळाली तर हे प्रमाण ८० टक्क्यांवर जाऊ शकेल. असे झाले तर फक्त रशिया या एकाच देशातील तेलसाठा अमेरिकेच्या प्रभावाच्या बाहेर राहील. तेलाच्या माध्यमातून जगाच्या अर्थव्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्याचा अमेरिकेचा पूर्वीपासूनच प्रयत्न राहिला आहे. सोव्हिएत युनियनच्या पाडावानंतर अमेरिका जगातली एकमेव महासत्ता बनली होती, परंतु गेल्या काही वर्षांमध्ये चीन एक मोठी आर्थिक शक्ती म्हणून उदयाला येत आहे आणि बऱ्याच क्षेत्रांमध्ये अमेरिकेसमोर चीनचे आव्हानही उभे राहत आहे. जगातल्या ८० टक्के तेलसाठ्यावर अमेरिकेचे नियंत्रण आल्यावर चीनला तेलासाठी मुख्यत: रशियावर अवलंबून राहावे लागेल. अशा प्रकारे अमेरिकेला चीनच्या वाढत्या प्रभावावरही वचक ठेवता येईल.

इराण आणि अमेरिकेदरम्यान झालेल्या करारामध्ये इराणची पाश्चिमात्य देशांमध्ये असलेली पण त्या राष्ट्रांनी गोठवलेली सत्तर ते ऐंशी अब्ज डॉलर्सची संपत्ती इराणला परत करण्यासंदर्भातील एक कलम समाविष्ट करण्यात आले आहे. थोडक्यात, अण्वस्त्र कार्यक्रम सुरू ठेवल्याबद्दल इराणवर अमेरिकेने लादलेले आर्थिक निर्बंध शिथिल करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न असल्याचे दिसते. त्या मोबदल्यात इराणनेही आपल्याकडील तेल डॉलर्समध्ये विकायला सुरूवात केली तर अमेरिकेचे मुख्य ध्येय साध्य होईल. गेल्या काही काळात रशिया आणि चीन या राष्ट्रांनी जागतिक अर्थव्यवस्थेतील डॉलरचे महत्त्व कमी करण्याचा (डीडॉलरायजेशन) प्रयत्न सुरू केला आहे. डीडॉलरायजेशनमुळे अमेरिकेचे आर्थिक नुकसान तर होईलच, पण जागतिक राजकारणात अमेरिकेचा प्रभावही कमी होऊ शकेल, ही अमेरिकेची मुख्य भीती आहे. हे डीडॉलरायजेशन रोखण्यासाठीच अमेरिकेला जास्तीत जास्त तेलसाठ्यांवर नियंत्रण हवे आहे. सध्या चीन व्हेनेझुएला आणि इराण या दोन देशांकडून आयात होणाऱ्या तेलावर अवलंबून आहे. या दोन्ही देशांच्या तेलावर अमेरिकेचे नियंत्रण आल्यावर चीनच्या अर्थव्यवस्थेवर आपोआपच अमेरिकेचे काही प्रमाणात नियंत्रण येऊ शकेल आणि डीडॉलरायजेशन थांबेल, असा अमेरिकेचा होरा आहे. या मुद्द्यांचा विचार केला असता अमेरिकेने इराणशी केलेल्या कराराद्वारे अमेरिकेची उद्दिष्टे साध्य होतात.

इराणच्या दृष्टीने विचार केला, तर हा देश गेल्या अनेक वर्षांपासून अमेरिकेने लादलेल्या आर्थिक निर्बंधांपासून सुटका मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. या निर्बंधांमुळे इराणच्या अर्थव्यवस्थेवर खोलवर आणि विपरित परिणाम झाला आहे. या करारामुळे इराणचा पाश्चिमात्य देशांमध्ये अडकून पडलेला निधी खुला होईल आणि त्यांच्या अर्थव्यवस्थेला मोठा आधार मिळेल. त्याचबरोबर त्यांचे तेल विकायची परवानगीही मिळू शकेल. अर्थात त्यात अमेरिकेची तेल डॉलर्समध्ये विकण्याची अट असणारच आहे. ही अट मान्य करायला अमेरिका इराणला भाग पाडेल. अशा प्रकारे या करारामध्ये इराण आपले आर्थिक हित साधत आहे आणि अमेरिकाही व्यापक आर्थिक हित साधत आहे. अमेरिकेने करार करून इराणवरील निर्बंध उठवले, हा आपला विजय असल्याचे इराणचे शासक मानतील आणि आंतरिकदृष्ट्या इराणचे सरकार आणखी सुदृढ होईल यात शंका नाही. यातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे या शांतता करारात अमेरिकेने पाकिस्तानचे प्यादे पुढे केले आहे. त्यामागील कारण काय, हा प्रश्न उपस्थित होतो. कारण अमेरिका आणि इराण यांच्यामध्ये सुरूवातीपासून वाटाघाटी सुरू होत्या, त्यात कतार आणि ओमान या देशांनी पुढाकार घेतला होता. त्यावेळी अमेरिका आणि इराणमध्ये मतैक्य होत आल्याचे ओमानच्या परराष्ट्रमंत्र्यांचे म्हणणे आहे. तेवढ्यात अमेरिकेने घुमजाव करून पुन्हा इराणवर हल्ले सुरू केले होते.

त्यानंतर पाकिस्तानला या वाटाघाटींमध्ये अचानक ओढले गेले. या वाटाघाटींमधील पाकिस्तानच्या प्रवेशामागे अमेरिकेची दक्षिण आशियातील खेळी आहे, असे वाटते. या करारात पाकिस्तानची खरोखरच मदत झाली की नाही ते इराण आणि अमेरिका जाणे, पण सिंधू जलकरार रद्द केल्यानंतर भविष्यात भारत पाकिस्तानवर दबाव टाकेल तेव्हा पाकिस्तानने केलेल्या मदतीचे भांडवल करून अमेरिका पाकिस्तानच्या मदतीला धावून येईल. यात पाकिस्तानने आम्हाला इराणबरोबरच्या कराराच्या वेळी मदत केली होती आणि आम्ही आता त्याची परतफेड करत आहोत, अशी अमेरिकेची भूमिका असेल. प्रत्यक्षात मात्र अमेरिकेचा अंतस्थ हेतू पाकिस्तानला भारतावर वचक ठेवण्यासाठी प्यादे म्हणून वापरण्याचाच आहे. अमेरिकेची ही खेळी पूर्वापार चालत आली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारत-अमेरिका संबंध सुधारले होते आणि अमेरिकेला पाकिस्तानचा मोहरा म्हणून वापर करता येत नव्हता. आता यानिमित्ताने अमेरिकेला आपली त्या संदर्भातली भूमिका पुन्हा सुदृढ करायची आहे. अमेरिका-इराण वाटाघाटींमध्ये पाकिस्तानला एवढी मोठी भूमिका देण्यामागे दुसरे काहीही कारण नाही. पण पाकिस्तानला लवकरच समजून येईल, की चीनकडून शस्त्रास्त्रे मिळू शकतात, अमेरिकेकडून डॉलर्स मिळू शकतात, अरब देशांकडून तेल मिळू शकते, परंतु यापैकी कोणीही जगण्यासाठी लागणारे पाणी देऊ शकत नाही. या पाण्यावर सध्या भारताचा ताबा असल्यामुळे पाकिस्तानला नमवण्यासाठी भारत त्याचा नक्कीच उपयोग करणार आहे. पण ही जाण पाकिस्तानला आणि त्यांच्या जनतेला कधी येईल, हा प्रश्न आहे.

या करारात अमेरिकेची उद्दिष्ट्ये साध्य झाली असली तरी इस्राईलची उद्दिष्ट्ये अजूनही साध्य झाली नसल्यामुळे इस्राईलने या कराराला मान्यता देण्यास नकार दिला असून हमास आणि हिज्बुलासारख्या संघटनांवर आपल्या बाजूने हल्ले सुरूच राहतील, असे स्पष्ट केले आहे. याचा परिणाम असा होईल, की अमेरिका फार तर १९६८ पूर्वीच्या इस्राईलच्या सीमेला आणि इस्राईलच्या अस्तित्वाला मान्यता देण्यासाठी इराणवर दबाव टाकेल. या करारात आणखी काही वाटाघाटी करायला वाव ठेवला असून त्यासाठी ६० दिवसांचा कालावधी ठेवण्यात आला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे यापूर्वीचे वर्तन पाहता ते कधीही आपल्या भूमिकेपासून घूमजाव करू शकतात. पण इराणच्या तेलसाठ्यावर अमेरिकेचे कितपत नियंत्रण येते आणि इराण तेलाची विक्री डॉलर्समध्ये करायला तयार होतो का, या मुद्द्यांवर या कराराचे भवितव्य अवलंबून असेल. नोव्हेंबरमध्ये येऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये अमेरिकन काँग्रेस आणि सिनेटमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांचे बहुमत गेले तर त्यांच्याविरुद्ध महाभियोग प्रस्ताव मांडण्यात येईल हे नक्की. त्यात त्यांची सत्ता गेली, की त्यांनी सगळे नियम धाब्यावर बसवून सुरू केलेला एकछत्री अंमल नोव्हेंबरनंतर बंद होईल. म्हणजे विद्यार्थी आणि एचवनबी व्हिसा, विविध टॅरिफ्स हे सगळे पूर्वपदावर येऊ शकेल. परंतु डेमॉक्रॅटिक किंवा रिपब्लिकन पक्षांपैकी कोणाचेही सरकार असले तरी डीडॉलरायजेशन सारख्या मुद्द्यावर अमेरिकेच्या भूराजकीय धोरणावर एकमत पहायला मिळेल. त्यादृष्टीने ट्रम्प यांनी केलेल्या गोष्टींमध्ये फारसा फरक पडेल असे वाटत नाही.

---

**चर्चा आजची**

# व्यावसायिक शिक्षणाचा वाढता क्रेझ

प्रमोद जाधव



शिक्षण असूनही शासकीय खात्यात नोकरी मिळेल याची अशा नसते.त्यामुळे अनेक तरुणांवर बेरोजारीचे संकट उभे राहिले आहे. मात्र स्वतःचा नोकरी व्यवसाय उभा करण्यासाठी तरुण वर्ग आयटीआय व अन्य व्यावसायिक शिक्षणाकडे वळला आहे.व्यावसायिक शिक्षणामुळे नोकरी, रोजगाराचे साधन खुले होत आहे. त्यामुळे अनेक तरुण या शिक्षणावर भर देत आहे.९० हजार हून अधिक विद्यार्थ्यांनी व्यावसायिक शिक्षणासाठी अर्ज केल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. इंजिनिअरसह आयटीआय, वकील व इतर व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांची लगबग सुरु झाली आहे. व्यावसायिक शिक्षणाकडे तरुणांचा कल ४० टक्के वाढला असल्याचे बोलले जात आहे.

दहावी, बारावी, पदवीधर व त्याही पेक्षा अधिक उच्च शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नसल्याने बेरोजगारीचे संकट निर्माण झाले आहे. शासकीय खात्यात नोकरी लाखो अर्ज येतात. त्यामध्येही आपला नंबर लागेल की नाही, याची खात्री नसते. त्यामुळे चांगले शिक्षण घेऊनही घरीच बसण्याची वेळ अनेकांवर येते. परंतू रायगड जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यात औद्योगिकीकरण झपाट्याने वाढत आहे. मुंबई, पुणे सारख्या मोठ्या शहरांमध्ये व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांना चांगली संधी मिळत आहे. त्यामध्ये रायगड जिल्ह्यातही औद्योगिकरणाचे जाळे पसरू लागले आहे. दहावी, बारावी झाल्यावर उच्च शिक्षण घेण्याचा क्रेझ प्रचंड होता. उच्च शिक्षण घेतल्यावर सरकारी नोकरी मिळविण्यावर भर अधिक होता. व्यावसायिक शिक्षणाकडे प्रवेश घेणाऱ्यांची संख्या नगण्य होती. व्यवसायिक शिक्षणाकडे विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी व्यावसायिक शिक्षण संस्थांमार्फत स्कूल कनेक्ट कार्यक्रम राबविण्यात आले. जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतीमध्ये जाऊन व्यवसायिक शिक्षणाचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे कुशल मनुष्यबळाची गरज निर्माण होणार आहे. याची जाणीव वेगवेगळ्या उपक्रमाच्या माध्यमातून करून देण्यात आली. गावागावात जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले. आज रोजगाराची संधी म्हणून आयटीआय, व इतर व्यावसायिक शिक्षणातन मिळत आहे. झटपट मिळत असलेल्या नोकरीच्या संधीमुळे विद्यार्थ्यांचा आयटीआय व इतर व्यावसायिक शिक्षणाच्या प्रवेशाकडे कल वाढत आहे.

व्यावसायिक शिक्षणातून रोजगाराचे साधन खुले होण्याची संधी मिळू लागल्याने जिल्ह्यातील अनेक तरुण गेल्या आठ वर्षापासून व्यवसायिक शिक्षणाकडे वळू लागले आहेत. तरुणांसह तरुणीदेखील या व्यवसायिक शिक्षणाकडे रमू लागले आहेत. शिक्षण पुर्ण झाल्यावर वर्षभर एखाद्या कंपनीत रोजगार मिळणे. त्यानंतर अन्य कंपनीत कायम नोकरी मिळण्याचे प्रमाण वाढल्याने अनेक तरुण दहावी, बारावीनंतर व्यवसायिक शिक्षणाकडे वळू लागले आहे. व्यवसायिक शिक्षणाकडे तरुणांचा कल ४० टक्केने वाढला असल्याचे बोलले जात आहे.जिल्ह्यात वेगवेगळे प्रकल्प येऊ लागले आहेत. या प्रकल्पांमुळे जिल्हयाच्या ठिकाणीच व्यवसायिक शिक्षण घेतलेल्या बेरोजगारांना रोजगाराचे साधन अधिक खुले होण्याची शक्यता आहे.महाविद्यालयीन शिक्षण पुर्ण होऊनदेखील नोकरी मिळविण्यासाठी स्कील डेव्हलमेंटचे कोर्स करावे लागतात. त्यामुळे वेळ, पैसा, मोठ्या प्रमाणात खर्च होतो. नोकरीचे वयही निघून जाते. त्याचा परिणाम बेरोजगारी वाढण्याची भिती अधिक निर्माण होते. परंतू व्यवसायिक शिक्षणामुळे नोकरी, रोजगाराचे साधन तातडीने खुले होत असल्याने तरुणांनी व्यावसायिक शिक्षणावर अधिक भर देण्यास सुरुवात केली आहे. व्यावसायिक शिक्षणासाठी हजारो विद्यार्थ्यांनी अर्ज यंदा केल्याचे समोर आले आहे. दहावी, बारावीचा निकाल लागल्यानंतर आयटीआय बरोबरच इंजिनिअर व इतर व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांची लगबग सुरु झाली आहे.या शिक्षणासाठी लागणारे दाखले मिळविण्यासाठी सरकारी कार्यालयात धावाधाव होत असल्याचे दिसून येत आहे. इंजिनिअर व इतर व्यावसायिक शिक्षण घेणारे मागासवर्गीय घटकातील विद्यार्थी जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी संबंधित कार्यालयात जात आहे. त्यासाठी लागणारी ऑनलाईन प्रक्रीया पूर्ण करण्याकडेही लक्ष दिले जात आहे. रायगड जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी व्यावसायिक शिक्षण संस्था उभ्या आहेत. या शिक्षण संस्थांमार्फत शिक्षण घेण्यावर भर मोठ्या प्रमाणात दिला जात आहे. आयटीआयसह अन्य व्यावसायिक शिक्षण संस्थामध्ये प्रवेश घेण्याची लगबग प्रचंड वाढली आहे. व्यावसायिक शिक्षणातून स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी तरुणांना मिळत आहे. काही तरुण कंपनीत काम करतात. तर काही तरुण व्यावसायिक शिक्षण घेऊन स्वतःचा व्यवसाय उभा करतात. त्यामुळे व्यावसायिक शिक्षणाला प्रचंड महत्व प्राप्त झाले आहेत.

---

**लोकसंसद**

## देशात दररोज ८४ पादचाऱ्यांचा नाहक मृत्यू

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने जाहीर केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार देशात रस्ते अपघातात २०१९ ते २०२४ या ५ वर्षांत झालेल्या एकूण १.८ लाखांहून अधिक मृत्यूंपैकी, दरवर्षी सरासरी ३० हजार ५०० हून अधिक पादचारी मृत्यू पावले. म्हणजेच दररोज ८४ नागरिकांना असुरक्षित पदपथावर नाहक मरण आले. सर्वात चिंताजनक बाब म्हणजे या एकूण मृत्यूंपैकी तब्बल ३१ टक्के मृत्यू हे राष्ट्रीय महामार्गांवरील रस्त्यांवर झाले आहेत. तसेच एकूण रस्ते अपघातातील मृत्यूंमध्ये पादचाऱ्यांच्या मृत्यूंची संख्या २० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. अहवालानुसार पादचाऱ्यांच्या मृत्यूंची सर्वाधिक संख्या तामिळनाडूमध्ये (४,७१२) नोंदवली गेली असून त्यानंतर बिहार (४,१४९), महाराष्ट्र (३,३४४) आणि पश्चिम बंगाल (३,२४१) यांचा क्रमांक लागतो. रस्ते सुरक्षा व वाहतूक तज्ज्ञांच्या मते पादचाऱ्यांना चालण्यासाठी स्वतंत्र आणि सुरक्षित पदपथ नसणे तसेच रस्ता सुरक्षितपणे ओलांडण्यासाठी झेब्रा क्रॉसिंग नसणे ही भारतातील पादचाऱ्यांच्या मृत्यूचे प्रमाण सर्वाधिक असण्यामागील मुख्य कारणे आहेत. अलिकडेच पादचाऱ्यांच्या वाढत्या मृत्यूंची दखल घेत, सर्वोच्च न्यायालयाने पदपथावरून चालण्याच्या नागरिकांच्या अधिकाराला 'मूलभूत अधिकार' म्हणून मान्यता दिली आहे आणि सर्व रस्त्यांवर सुरक्षित, चिन्हांकित पदपथ असावेत यासाठी कायदा करण्याचे निर्देश सरकारला दिले आहेत. देशातील राज्य सरकारे त्याची अंमलबजावणी तत्परतेने करतील अशी अपेक्षा आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

**दिनविशेष**

# अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे

आज २३ जून, आपल्या मधुर आवाजाने रसिकांच्या हृदयात स्थान मिळवणारे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांचा स्मृतिदिन. प्रल्हाद शिंदे यांना भक्ती गीतांचा बादशहा म्हंटले जाते कारण त्यांनी गायलेली सर्व भक्तिगीते लोकप्रिय झाली. केवळ भक्तिगीते नाही तर भावगीते, कव्वाली आणि कोळी गीतांवर देखील ठसा उलटवला. सर्व प्रकारची लोक गीते गाण्याचा आणि ती लोकगीते लोकप्रिय करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. प्रल्हाद शिंदे यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. महाराष्ट्रात कोणताही सण उत्सव असो त्यांनी गायलेली गाणी वाजवल्या शिवाय तो सण उत्सव पूर्ण होतच नाही. मग तो गणपती उत्सव असो की नवरात्र उत्सव, आषाढी एकादशी असो की सत्यनारायणाची महापूजा, आंबेडकर जयंती असो की बुद्ध पौर्णिमा इतकेच काही गावातील संदल उरूस देखील त्यांच्या कव्वाली शिवाय पूर्ण होत नाही कारण त्यांनी गायलेली ऐका सत्य नारायणाची कथा, चल ग सखे पंढरीला, बाप्पा मोरया रे, उड जायेगा एक दीन पंछी रहेगा पिंजरा खाली.... अशी त्यांनी गायलेली शेकडो गाणी आजही लोकप्रिय आहे. ही गाणी अजरामर आहेत. ही गाणी ऐकली नाहीत असा एकही माणूस महाराष्ट्रात शोधूनही सापडणार नाही. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वानाच ही गाणी तोंडपाठ आहेत. केवळ हीच नाही तर यासारखी शेकडो लोकप्रिय गाणी गाऊन त्यांनी रसिकांच्या हृदयात स्थान मिळवले आहे. १९३३ साली सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा गावात त्यांचा झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भगवानराव तर आईचे नाव सोनाबाई असे होते. त्यांना दोन मोठे भाऊ होते. घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्याने प्रल्हाद शिंदे यांचा परिवार ते लहान असतानाच मुंबईत आले. गोड गळ्याची दैवी देणगी लाभलेल्या प्रल्हाद शिंदे यांनी लहान वयातच मुंबईच्या रस्त्यांवर रेल्वे स्टेशनवर गाणी गायला सुरुवात केली. त्यांची आई आणि भाऊही गाणी गाऊन त्यांना साथ देऊ लागली. त्यातून त्यांचा उदरनिर्वाह होऊ लागला. अतिशय गरीब घराण्यात जन्म घेतलेला, बहुजन समाजात जन्मलेला, गायनाचे किंवा संगीताचे कोणतेही शिक्षण न घेतलेल्या प्रल्हाद शिंदे यांचा आवाज मुंबईत लोकप्रिय होऊ लागला. त्यांची गाणी जशी लोकप्रिय होऊ लागली तशी त्यांच्या आवाजाची जादू महाराष्ट्रभर पसरू लागली. गावागावातून त्यांना गाणी गाण्यासाठी बोलावणे येऊ लागले. नवरात्र उत्सव, आंबेडकर जयंती, गावातील यात्रा, जत्रा, बुद्ध पौर्णिमा, संदल - उरूस अशा कार्यक्रमात त्यांना बोलावणे येऊ लागले. त्यांची गाणी ऐकण्यासाठी लोक लांबून लांबून येऊ लागली. पाहता पाहता त्यांचा आवाज महाराष्ट्रभर पसरला. महाराष्ट्रातील ते सर्वाधिक मागणी असलेले गायक बनले. उभ्या महाराष्ट्रात पायाला भिंगरी लावल्यासारखे ते गाण्यासाठी भटकले. त्यामुळे त्यांनी माणसे जोडली आणि ते जाती धर्माच्या पलीकडे जाऊन पोहचले. प्रल्हाद शिंदे आपल्या गाण्याच्या कार्यक्रमाचा शेवट नेहमी एका आगळ्या वेगळ्या गीताने करीत. त्यांनी सर्व प्रकारची गाणी गायली. भजन, कीर्तन, लोकगीते, बुद्ध धर्माची गाणी, डॉ. बाबासाहेबांची गाणी त्यांनी घराघरात पोहचवली. त्यांची गाणी इतकी लोकप्रिय झाली की लोकांनी त्यांना डोक्यावर घेतले. प्रल्हाद शिंदे यांनी गायनाचा धंदा केला नाही म्हणून त्यांना कधीही आर्थिक स्थैर्य मिळाले नाही पण त्यांच्या गाण्यांमुळे कॅसेट कंपन्या मात्र गब्बर झाल्या. २३ जून २००३ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या गाण्याची परंपरा पुढे आनंद शिंदे, मिलिंद शिंदे, चंद्रकांत शिंदे या मुलांनी जपली तीच परंपरा त्यांची नातवंडं देखील जपत आहे. आज शिंदे घराणे हे संगीत क्षेत्रातले ब्रँड बनले आहे याचे सर्व श्रेय प्रल्हाद शिंदे यांना जाते. मधुर गळ्याचे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

# वाहतूक कोंडीची समस्या सुटणार

## रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी १४.५० कोटींची तरतूद; निविदाही मागविल्या, पावसाळ्यानंतर कामाला सुरुवात

| चिरनेर | प्रतिनिधी |

वाहतूक कोंडींची समस्या दूर करण्यासाठी चार फाटा ते तेलीपाडा १३ कोटी व जेएनपीए ते फुंडे हायस्कूल दरम्यानचा १.५ कोटी खर्च अशा दोन्ही रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या कामासाठी सिडकोने निविदा मागविल्या आहेत. पावसाळ्यानंतर किंवा दिवाळीपर्यंत या दोन्ही रस्त्यांच्या कामांना प्राधान्याने सुरूवात केली जाणार आहे, अशी माहिती सिडकोच्या द्रोणागिरी नोड-२ विभागाचे कार्यकारी अभियंता राजीव कोलाप यांनी दिली.



उरण ओएनजीसी, चारफाटा, एसटी स्टँड, करंजा रस्त्याला जोडणारा चार फाटा ते तेलीपाडा हा जुना ७ मीटर रुंदीचा रस्ता आहे. वाढत्या औद्योगिकीकरण व वाढत्या रहदारीमुळे या रस्त्यावर वाहतूक कोंडी नित्याचीच बाब झाली आहे. ही वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासाठी सिडकोने चार फाटा ते तेलीपाडा हा जुना ७ मीटर रुंदीचा रस्ता रुंदीकरणाच्या कामासाठी मंजूर करण्यात आले आहे. १.७ किमी लांबीचा रस्त्याची रुंदी ७ मीटरवरुन २० मीटरपर्यंत वाढविण्यात येणार आहे. यासाठी १३ कोटी रुपये खर्चाच्या रस्त्याच्या कामाला मंजुरी देण्यात आली आहे.

तसेच जेएनपीए कामगार वसाहत ते बोकडवीरा फ्लायओव्हर दरम्यान जुना रस्ता वाढत्या रहदारी व वाहतुकीसाठी अगदी अरुंद आहे. त्यामुळे या रस्त्यावरही वाहतूक कोंडीची समस्या दररोजची आहे. त्यामुळे या दरम्यान असलेल्या सुमारे ५ किमी लांबीचा रस्त्याचेही रुंदीकरण करण्याचे कामही सिडकोच्या विचाराधीन आहे. मात्र या मार्गावरील कामासाठी फुंडे हायस्कूल ते बोकडवीरा फ्लायओव्हर दरम्यान रस्त्याच्या कडेला असलेल्या मोठ्या प्रमाणावर असलेल्या खारफुटींचा अडथळा येत आहे. यासाठी वनखात्याच्या अखत्यारीतील परवानगीसाठी पाठपुरावा, पत्रव्यवहार सुरू आहे.

मात्र, जेएनपीए ते फुंडे हायस्कूल दरम्यानचा ५०० मीटर लांबीचा अरुंद रस्ता सध्या वाहतुकीसाठी डोकेदुखी ठरत आहे. यामुळे वनविभागाचा कोणताही अडथळा येत नसलेल्या जेएनपीए ते फुंडे हायस्कूल दरम्यानचा ५०० रस्त्याच्या कामाला सिडकोने मंजुरी दिली आहे. तुर्तास वनविभागाच्या विविध परवानग्या मिळेपर्यंत ५०० मीटर लांबीचा रस्ता २० मीटर रुंद करण्यात येणार आहे. यासाठी सुमारे १.५० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून मंजुरीनंतर निविदाही मागविण्यात आलेल्या आहेत.

चार फाटा ते तेलीपाडा १३ कोटी व जेएनपीए ते फुंडे हायस्कूल दरम्यानचा १.५ कोटी अशा एकूण १४.५० कोटी खर्चाच्या दोन्ही रस्त्यांचे रुंदीकरणाच्या कामाच्या सिडकोने निविदा मागविल्या आहेत. या दोन्ही रस्त्यांच्या कामांना पावसाळ्यानंतर किंवा दिवाळीपर्यंत सुरूवात केली जाणार आहे.

या दोन्ही रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या कामांमुळे या मार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यात मोठ्या प्रमाणावर मदत होईल, अशी माहिती सिडकोच्या द्रोणागिरी नोड-२ विभागाचे कार्यकारी अभियंता राजीव कोलाप यांनी दिली.

# पनवेल मनपाच्यावतीने योग दिन उत्साहात

| पनवेल-कळंबोली | प्रतिनिधी |

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्ताने पनवेल महानगरपालिकेच्यावतीने वडाळे तलावाजवळ ‘योग दिवस’ साजरा करण्यात आला. पतंजली योग समितीचे, भारतीय नौसेनेचे निवृत्त लेफ्टनंट पतंजली योग समितीचे मुख्य प्रशिक्षक राम पलट यादव यांनी यावेळी उपस्थितांना योगासने व प्राणायम, ध्यान याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



यावेळी विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता म्हात्रे, महापालिका सदस्य शशिकांत शेळके, गणेश कडू, दर्शना भोईर, मोनिका महानवर, स्नेहल ढमाले, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, उपायुक्त मंगला माळवे, मलनिस्सारण विभागप्रुख अनिल कोकरे, पतंजलि योग समिति, मुंबई विभागाचे प्रमुख रविंद्र मोरे, पतंजली योग समिती पनवेल विभागाच्या प्रमुख कविता नायर, पतंजली योग समिती माध्यम विभागव सह-जिल्हा प्रभारी अविनाश खोपकर, पतंजली योग समिती कामोठे तालुका प्रभारी प्रमुख नागेंद्र शर्मा, पालिकेचे अधिकारी व कर्मचारी, विद्यार्थी नागरिक उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार विक्रांत पाटील म्हणाले की, योग ही आपली जीवनशैली असली पाहिजे, योग ही आपल्या इतिहासाने, परंपरेने दिलेली देणगी आहे. साऱ्या जगाला आता योगाचे महत्व पटले आहे. म्हणूनच आजच्या दिवशी जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करताना भारत देशाचे नाव गौरवाने घेतले जात आहे.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात पंतजली योग समितीचे राम पलट यादव यांनी योग साधनेचे महत्त्व सांगितले. तसेच ताडासन, वक्रासन, अर्ध चक्रासन, त्रिकोणासन, वृक्षासन, धनुरासन, माज्ररासन असे आसानाचे विविध प्रकार शिकवून त्याचे फायदे सांगितले.

तसेच प्राणायमामध्ये कपालभाती, भ्रामरी, अनुलोम विलोम याबद्दल मार्गदर्शन केले. याबरोबरच ध्यान करण्यास सांगून त्याचा शरीराला होणारा लाभ याबाबत सविस्तर माहिती दिली.

## अमृत योग वर्ग कार्यक्रम

| अलिबाग | प्रतिनिधी |

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था यांच्या वतीने रविवारी (दि.२१) अमृत रायगड-अलिबाग कार्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ‘अमृत योग वर्ग’ साजरा करण्यात आला. यानिमित्त योग प्रशिक्षक कुमार जोगळेकर यांनी परिसरातील मुलांना योगचे प्रात्यक्षिक दाखवून करवून घेतले. अमृत सखी जान्हवी साठे हिने सर्व मुलांसाठी योग साधनेनंतर थंड पेयाची सोय केली. ‘अमृत वर्ग’ या उपक्रमामुळे मुलांना योग प्रशिक्षण मिळतेच म्हणून पालकांनी आभार व्यक्त केले.कार्यक्रमास मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक, महिला व तरुणांनी सहभाग नोंदवला.



## सर एस.ए. हायस्कूलमध्ये योग दिन

| कोर्लई | प्रतिनिधी |

मुरुडच्या जंजिरा विद्या मंडळ संचालित सर एस. ए. हायस्कूल व स्व. म.ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालयात जागतिक बारावा योग दिन साजरा करण्यात आला. हायस्कूलचे माजी क्रीडा शिक्षक व संस्थेचे संचालक पांडुरंग आरेकर यांनी विद्यार्थ्यांना योगासन प्राणायाम यांचे महत्त्व समजवत मार्गदर्शन करुन विद्यार्थ्यांकडून योगासन प्रात्यक्षिक करून विद्यार्थांना प्रोत्साहित केले. यावेळी शाळेतील मॉर्निंग स्टार तसेच इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी योग दिनाच्या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘योग्य, प्रामाणिक मार्गदर्शन आवश्यक’

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत मेडिकल असोसिएशनतर्फे १२ वा जागतिक योग दिन रॉयल गार्डन हॉटेल येथे उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित विशेष मार्गदर्शन सत्राला आरोग्याबाबत जागरूक असलेल्या मोठ्या संख्येने डॉक्टरांनी उपस्थिती दर्शविली. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते वैभव पटवर्धन यांनी योग आणि प्राणायामाच्या शास्त्रीय व व्यावहारिक पैलूंवर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, योग्य व प्रामाणिक ज्ञानाशिवाय योगासने किंवा प्राणायाम करू नयेत. अपूर्ण ज्ञानाच्या आधाराने चुकीच्या पद्धतीने योग अथवा प्राणायाम शिकवणाऱ्या तथाकथित गुरूंकडे मार्गदर्शन घेतल्यास त्याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो आणि काही वेळा काहीही न करण्यापेक्षाही तो अधिक घातक ठरू शकतो. तसेच, योगाभ्यासादरम्यान तसेच दैनंदिन जीवनातील प्रत्येक हालचालीत योग्य शरीरस्थिती राखण्याचे महत्त्व त्यांनी यावेळी सांगितले. योग्य पोश्चरमुळे आरोग्य सुधारण्यास मदत होते, असेह त्यांनी नमूद केले.




■ (छायाचित्र : संजय गायकवाड)

# जागतिक योग दिन उत्साहात साजरा

| रसायनी | प्रतिनिधी |

श्रीमद् जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी, दक्षिण पीठ, नाणीजधाम यांच्या प्रेरणेने रायगड युवा सेनेच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.



या निमित्ताने विविध ठिकाणी योग शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. युवा सेना पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक तसेच युवक-युवतींनी मोठ्या संख्येने सहभागी होत योगासने, प्राणायाम आणि ध्यान साधना केली. योगामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते तसेच निरोगी जीवनशैलीचा अंगीकार करण्यास प्रेरणा मिळते, असा संदेश यावेळी देण्यात आला.

श्रीमद् जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या मार्गदर्शनाखाली समाजात आरोग्य, संस्कार आणि अध्यात्म यांचा प्रसार व्हावा, या उद्देशाने विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून जागतिक योग दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला सर्व स्तरांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

रायगड युवा सेनेच्या सर्व तालुका पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन करून यशस्वी आयोजन केले.

## माणगावात योग सराव शिबीर उत्साहात

| माणगाव | प्रतिनिधी |

आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून माणगाव तालुक्यातील उतेखोल येथील वाकडाई रिसॉर्टमध्ये योग सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. निरोगी शरीर, सुदृढ मन आणि संतुलित जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमास पदाधिकारी, कार्यकर्ते व योगप्रेमी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाची सुरुवात योग दिनाच्या महत्त्वाविषयी मार्गदर्शनाने करण्यात आली. यावेळी विविध योगासने, प्राणायाम, ध्यानधारणा तसेच दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. उपस्थितांनी योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सामूहिक योगाभ्यास करून निरोगी जीवनाचा संकल्प केला.



## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



विहा जिगर काराणी, १ ला वाढदिवस अलिबाग



## संत नामदेव विद्यालयात योग दिन

**पाली-गोमाशी :** जागतिक योग दिनानिमित्त संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नांदगाव येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या पटांगणावर सर्व विद्यार्थी व शिक्षकांच्या सामूहिक योगाभ्यासाने झाली. त्यानंतर माजी विद्यार्थिनी अर्चना कोकाटे यांनी ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, वज्रासन यांसारखी विविध योगासने आणि प्राणायामचे महत्त्व पटवून देत प्रत्यक्ष कृती करून दाखवली.



## विद्यार्थ्यांकडून विविध योगासनांचा सराव

**विंधणे :** बी. एस. पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, विंधणे येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात योगसत्राने झाली. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने व प्राणायामाचा सराव केला. यावेळी शिक्षकांनी योगाचे महत्त्व समजावून सांगत शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य, एकाग्रता आणि निरोगी जीवनशैलीसाठी योगाचे फायदे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना योग हा दैनंदिन जीवनाचा भाग बनवण्याचे आवाहन करण्यात आले.

## निवडक



■ (छायाचित्र : धम्मशील सावंत)

### सुदृढ आरोग्यासाठी योग संकल्पनेवर भर

**पाली/बेणसे :** आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून नवघर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करत योगदिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थी, मुख्याध्यापक आणि शिक्षक वृंदाने उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे उपशिक्षक राजेंद्र अंबिके यांनी विद्यार्थ्यांना योगदिनाचे औचित्य, मानवी जीवनात योगाचे असणारे अनन्यसाधारण महत्त्व आणि त्याचे दैनंदिन उपयोग याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच, आंतरराष्ट्रीय योगदिन २०२६ ची अधिकृत संकल्पना याविषयी माहिती देऊन, बालपणापासूनच योगाची सवय कशी भविष्यात निरोगी आयुष्याचा पाया रचते, हे सोप्या शब्दांत पटवून दिले. मार्गदर्शनानंतर प्रत्यक्ष योगासनांच्या प्रात्यक्षिकांना सुरुवात झाली. राजेंद्र अंबिके यांनी स्वतः प्रत्येक आसनाचे प्रात्यक्षिक दाखवत, ते करताना घ्यायची काळजी आणि श्वासोच्छवासाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.



### कळंबोलीत योग दिन उत्साहात

**कळंबोली :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त कळंबोली येथील सेक्टर-६ मधील राधाकृष्ण मंदिर परिसरात भव्य योगा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमादरम्यान योग प्रशिक्षक संतोष काशीद आणि विजय पांडे यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यान यांचे सविस्तर मार्गदर्शन केले. योगामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होते, असे सांगत प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करावा, असे त्यांनी आवाहन केले. या योग शिबिरात स्थानिक नागरिक, महिला व युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी सामूहिक सूर्यनमस्कार करून आंतरराष्ट्रीय योग दिनाचा संदेश अधिक प्रभावीपणे दिला. यावेळी स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांनी उपस्थितांचे आभार मानले व नागरिकांच्या आरोग्यवृद्धीसाठी अशा उपक्रमांचे आयोजन भविष्यातही सातत्याने करण्यात येईल, असे आश्वासन दिले.



### योग, शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कळंबोली :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्री शक्ती फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य आणि माधवबाग हॉस्पिटल, खोपोली यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य योग शिबीर व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. स्त्री-पुरुष सर्वांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या विशेष उपक्रमाला कळंबोली, कामोठे, खांदा कॉलनीमधील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. निसर्गरम्य वातावरणात आयोजित करण्यात आलेल्या या एकदिवसीय आरोग्य सहलीचा मुख्य उद्देश नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, योग व प्राणायामाचे महत्त्व पटवून देणे तसेच हृदयरोग व मधुमेह यांसारख्या गंभीर आजारांचे लवकर निदान करणे हा होता. शिबिरामध्ये योगासन, प्राणायाम, मेडिटेशन, बेसिक लाईफ सपोर्ट प्रशिक्षण तसेच आहार मार्गदर्शन यांसारख्या उपयुक्त सत्रांचे आयोजन करण्यात आले. यासोबतच ईसीजी, रक्तदाब, रँडम ब्लड शुगर, वजन, उंची, बीएमआय, तपासणी आणि तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आले.



### तंदुरुस्ती राखण्यासाठी योग उपयुक्त

**पनवेल :** आंतरराष्ट्रीय योग दिननिमित्त वाशीतील न्यूईरा हॉस्पिटलच्या वतीने ‘निरोगी वृद्धत्वासाठी योग’ या संकल्पनेवर आधारित विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले. योगाच्या माध्यमातून शारीरिक हालचाल, मानसिक शांतता आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देत निरोगी आरोग्यासाठी आवश्यक सवयी अंगीकारण्याचे महत्त्व या कार्यक्रमातून अधोरेखित करण्यात आले. योग प्रशिक्षिका इला त्रिवेदी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. वाढत्या वयातही नियमित स्ट्रेचिंग, श्वसनाचे व्यायाम आणि माइंडफुलनेससारख्या साध्या सवयी अंगिकारल्यास शरीराची बळकटी राखण्यासाठी, तणाव कमी करण्यास आणि एकूण आरोग्य सुधारण्यास मोठी मदत होते, असा सल्ला यावेळी देण्यात आला.

### नियमित योगा करण्याचे आवाहन

**माणगाव :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग. तटकरे महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील क्रीडा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रो. डॉ. राजेंद्र आचार्य यांनी जागतिक संगीत दिन, पितृदिन आणि आंतरराष्ट्रीय योग दिन यांच्या त्रिवेणी संगम योगाचे महत्त्व, उत्पत्ती यांची माहिती सांगितली. योगसाधनेमुळे शरीर निरोगी, मन शांत आणि उज्वल जीवन जगण्यास मदत होते. त्यामुळे सगळ्यांनी योग करा. निरोगी रहा, गाणे गा, आनंदी रहा तसेच वडिलांवर कृतज्ञतापूर्वक प्रेम करा. त्यांचा आदर करा आणि जीवनाचा आनंद घ्या, असे सांगून जगभरात योग दिन साजरा करण्यामागील उद्देश याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले.

वाढदिवसानिमित्त थेरोंडा शाळेला मोलाची भेट | अनिल कालेकर यांची सामाजिक बांधिलकी

# विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय

| रेवदंडा | प्रतिनिधी |

आजच्या काळात वाढदिवस म्हणजे केक कापणे, फटाके फोडणे किंवा मोठ्या प्रमाणावर खर्च करणे, अशीच सर्वसाधारण धारणा झाली आहे. मात्र समाजासाठी काहीतरी देण्याची भावना जपणारे व्यक्तिमत्त्व अजूनही आपल्या समाजात आहेत, याची प्रचिती अलिबाग तालुक्यातील थेरोंडा येथे आली. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत अनिल कालेकर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त थेरोंडा येथील मराठी प्राथमिक शाळा क्रमांक १ ला ५०० लिटर क्षमतेची पिण्याच्या पाण्याची टाकी भेट देऊन विद्यार्थ्यांसाठी मोलाचे योगदान दिले. शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा द्यानदेव खंडारे यांच्या विनंतीनुसार ही टाकी शाळेला देण्यात आली.




गावातील शाळा ही केवळ शिक्षणाचे केंद्र नसून गावाच्या संस्कृतीचे, परंपरेचे आणि सामाजिक जडणघडणीचे मंदिर असते. अनेक यशस्वी अधिकारी, शिक्षक, डॉक्टर, अभियंते आणि उद्योजक यांची पायाभरणी अशाच ग्रामीण मराठी शाळांमध्ये झाली आहे. मात्र बदलत्या काळात इंग्रजी शाळांच्या वाढत्या आकर्षणामुळे अनेक मराठी शाळा विद्यार्थीसंख्येअभावी संघर्ष करत आहेत. अशा परिस्थितीत गावातील शाळांना स्थानिक नागरिक, माजी विद्यार्थी आणि समाजातील दानशूर व्यक्तींनी मदतीचा हात देणे गरजचे आहे.

अनिल कालेकर यांनी केलेली ही मदत केवळ पाण्याची टाकी देण्यापुरती मर्यादित नसून गावातील शाळांविषयी असलेली आपुलकी, जिव्हाळा आणि सामाजिक जबाबदारी अधोरेखित करणारी आहे.

### शाळेचे संवर्धन हीच खरी समाजसेवा

आपल्या गावातील मराठी शाळांकडे पुन्हा प्रेमाने आणि अभिमानाने पाहण्याची आज गरज आहे. आपल्या मुलांना संस्कार, संस्कृती आणि मातृभाषेचे शिक्षण देणाऱ्या या शाळा टिकल्या तरच गावाची ओळख टिकून राहणार आहे. गावातील प्रत्येक नागरिकाने आपल्या शाळेशी नाते जोडून तिच्या विकासासाठी हातभार लावला, तर मराठी शाळांचे भवितव्य अधिक उज्वल होईल. गावची शाळा हीच गावाची शान; तिचे संवर्धन हीच खरी समाजसेवा हा संदेश अनिल कालेकर यांच्या या उपक्रमातून पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

# रानसई, पुनाडे धरणांनी गाठला तळ

## नागरिकांवर पाणी विकत घेण्याची, आठवड्यातून दोन दिवस पाणी कपात

| उरण | प्रतिनिधी |

यावर्षी पाऊस लांबल्यामुळे उरण तालुक्याला पाणीपुरवठा करणाऱ्या रानसई आणि पुनाडे या दोन्ही मुख्य धरणांनी आता तळ गाठला आहे. त्यामुळे संपूर्ण उरण परिसरात पाणीटंचाईच्या तीव्र झळा बसू लागल्या असून नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. या पार्श्वभूमीवर रानसई धरणाची उंची वाढवणे आणि पुनाडे धरणाची गळती थांबवून साठवण क्षमता वाढवण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.



केगाव आणि चाणजे या दोन ग्रामपंचायत हद्दीतील गावांना या पाणीटंचाईचा सर्वाधिक फटका बसला आहे. या भागात तब्बल १२ ते १५ दिवसांआड पाणी मिळत असल्याने नागरिकांना पाण्यासाठी बोअरवेल आणि विहिरींवर अवलंबून राहावे लागत आहे.

मात्र, आता विहिरींनीही तळ गाठल्याने नागरिकांवर महागड्या दराने पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. तालुक्यात जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेली अनेक कामे मागील चार वर्षांपासून रखडलेली असल्याने ही टंचाई अधिकच तीव्र झाली आहे. त्यातच साठवून ठेवलेले पाणी दूषित होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे.

उरण शहर, औद्योगिक परिसर आणि ग्रामीण भागातील २५ ग्रामपंचायती मिळून सुमारे दोन लाख लोकसंख्येला दररोज ४० एमएलडी पाण्याची आवश्यकता असते. उरण एमआयडीसीकडून मिळालेल्या माहितीनुसार रानसई धरणाची पाणीपातळी तब्बल ८२ फुटांपर्यंत खाली घसरली आहे.

धरणातील मृतसाठ्याची मर्यादा ८१ फुट आहे. दोन दिवसांनंतर हा मृतसाठा देखिल संपणार आहे. सद्यस्थितीत धरणात केवळ २ ते ३ दिवस पुरेल इतकाच मृत पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. त्यानंतर मात्र, धरणात शिल्लक राहिलेले पाणी अतिरिक्त पंप लाऊन काढले जाणार आहे. या टंचाईवर मात करण्यासाठी सिडकोकडून दररोज ४.५ एमएलडी पाणी घेतले जात आहे. तसेच आधीच आठवड्यातून दोन दिवस पाणी कपात लागू करण्यात आली असून, आता कमी दाबाने पुरवठा होत असल्याने नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन एमआयडीसी प्रशासनाने केले आहे.

उरण पंचायत समितीचे सभापती महेश म्हात्रे यांनी सांगितले की, ड़तालुक्यातील रानसई, केळ्याचा माळ, चांदायली वाडी, खैरकाठी, बंगल्याची वाडी, सागाचीवाडी, मार्गाची वाडी या आदिवासी वाड्यांना पाणीटंचाईने ग्रासले आहे.

> “पाणीपुरवठा करणाऱ्या दोन विद्युत पंपांपैकी एक पंप सध्या बंद आहे. यामुळे पाणीटंचाईच्या समस्येत आणखीनच भर पडली आहे. पंप दुरुस्तीसाठी जीवन प्राधिकरण विभागाला कळवण्यात आले असून, तोपर्यंत नागरिकांना या टंचाईचा सामना करावा लागणार आहे.”
>
> –ॲड. अविनाश ठाकूर

सध्यातरी प्रशासनाकडून यातील दोन आदिवासी वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तालुक्यात एकूण सहा आदिवासी वाड्या, चाणजे, केगाव आणि पुनाडे धरणावर अवलंबून असलेल्या आठ गावांना या पाणीटंचाईचा तीव्र सामना करावा लागत आहे.

---



## गोवठणेत कलाकारांचा सन्मान

**चिरनेर :** उरण तालुक्यातील गोवठणे येथील जय हनुमान नाट्य मंडळाच्या वतीने रविवारी (दि.२१) सन्मान रंगभूमीवरील कलाकारांचा सन्मान आयोजित करण्यात आला होता. या अनुषंगाने नटवर्य तथा दिग्दर्शक पांडुरंग पाटील, नाटककार धनेश्वर म्हात्रे, उद्योजक रमेश कोळी, रंगनायिका वैशाली मोहिते यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती लाभली होती. यावेळी मान्यवरांसह सहदिग्दर्शक शैलेंद्र म्हात्रे, नाट्य कलाकार लक्ष्मीकांत म्हात्रे, सुरेश म्हात्रे, कृष्णकांत म्हात्रे, नरेंद्र वर्तक, अशोक म्हात्रे, शितल म्हात्रे, हेमांगी म्हात्रे, निलेश म्हात्रे जगन वर्तक, रोहन म्हात्रे, विवेक वर्तक, आतिश वर्तक, प्रेम पाटील, अक्षय पाटील, महेश पाटील, चरण वर्तक, कांचन म्हात्रे, सोनम म्हात्रे, प्रियांका पाटील यांच्यासह नाट्य मंडळातील अन्य कलाकार व पडद्यामागील कलाकारांचा देखील मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



## पनवेल महापालिकेची नाले सफाई

**खांदा कॉलनी :** जून महिन्याचा तिसरा आठवडा संपत आला तरी मान्सूनचे जोरदार आगमन झालेले नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये पावसाबाबत उत्सुकता आणि प्रतीक्षा कायम होती. पण सोमवारी पहाटेच्या वेळी केवळ १५ ते २० मिनिटांच्या हलक्या सरी कोसळ्या. या पावसामुळे शहरातील काही सखल रस्त्यांवर पाणी साचण्याचे प्रकार दिसून येत आहेत. पावसाळ्यापूर्वी महापालिकेकडून नाले, गटारे आणि ड्रेनेज लाईन्सची साफसफाई करण्यात आली असली तरी काही ठिकाणी पाण्याचा निचरा तात्पुरता मंदावल्याचे चित्र आहे. पाणी साचलेल्या भागांची तातडीने दखल घेत स्वच्छता आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे तसेच स्वच्छता निरीक्षक महेंद्र भोईर यांनी संबंधित ठिकाणीची पाहणी करत, ज्या भागात पाणी साचले आहे, त्या ठिकाणी तत्काळ विल्हेवाट लावण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच शहरातील रस्त्यांवर पाणी साचू नये आणि नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी पनवेल महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी सर्वत्र लक्ष ठेवून आहेत. मान्सूनच्या जोरदार आगमनापूर्वीच आवश्यक तयारी पूर्ण करण्यासाठी प्रशासन युद्धपातळीवर कार्यरत असल्याचे दिसून येत आहे.



## वाहतूक पोलिसांकडून जनजागृती

**उरण :** नवी मुंबई वाहतूक शाखेचे पोलीस उप आयुक्त राहुल खाडे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या ‘शाळा दत्तक योजना २०२६-२७’ अंतर्गत न्हावाशेवा वाहतूक शाखेतर्फे मोरू नारायण म्हात्रे विद्यालय, कोपर येथे वाहतूक जनजागृती कार्यक्रम तसेच पर्यावरणपूरक संदेश देण्यासाठी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण व्हावी, वाहतूक शिस्त अंगीकारावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी न्हावाशेवा वाहतूक शाखेचे भिमराव गोंधळी यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा, वाहतूक सिग्नलचे महत्त्व, झेब्रा क्रॉसिंगचा वापर याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच पर्यावरण संरक्षण, प्रदूषणमुक्त वाहतूक आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी विद्यार्थ्यांच्या सहभागातून सायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीद्वारे वाहतूक शिस्त पाळा, पर्यावरण वाचवा असा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. कार्यक्रमास मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर, प्रणिता गोळे, पूजा कुमारी, प्रफुल्ल शिंदे, भैय्यासाहेब गायकवाड तसेच ५० ते ६० विद्यार्थी उपस्थित होते. नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी सुरू केलेली शाळा दत्तक योजना ही केवळ वाहतूक नियमांचे प्रबोधन करणारी योजना नसून विद्यार्थ्यांमधून जबाबदार वाहतूक दूत घडविण्याचा अभिनव उपक्रम आहे. न्हावाशेवा वाहतूक शाखेच्या हद्दीतील उर्वरित शाळांमध्येही अशाच प्रकारचे जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

---

## रोहा प्रेस क्लबची कार्यकारिणी जाहीर

| चणेरा | प्रतिनिधी |

पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्याम लोखंडे यांची रोहा प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे रोहा तालुक्यातील पत्रकारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून नव्या कार्यकारिणीकडून संघटनेच्या कार्याला अधिक बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



रायगड प्रेस क्लब तसेच अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेला रोहा प्रेस क्लब हा जिल्ह्यातील जागृत, निर्भीड आणि समाजाभिमुख पत्रकारांची संघटना म्हणून ओळखला जातो. नव्या कार्यकारिणीच्या निवड प्रक्रियेचा कार्यक्रम माजी अध्यक्ष सुहास खरिवले यांच्या अध्यक्षतेखाली तसेच ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

नवीन कार्यकारिणीत अध्यक्ष डॉ. श्याम लोखंडे, कार्याध्यक्ष सुहास खरिवले, उपाध्यक्ष जितेंद्र जाधव, उपाध्यक्ष अंजुम शेट्टे, सचिव रवींद्र कान्हेकर, सहसचिव दीपक भगत, खजिनदार दीप वायडेकर, मुख्य संघटक उद्धव आव्हाड, संघटक संतोष सातपुते, संपर्क प्रमुख विश्वजित लुमन, प्रसिद्धी प्रमुख मरवडे, सह प्रसिद्धी प्रमुख सत्यप्रसाद आडाव यांची निवड करण्यात आली आहे. पदग्रहण सोहळ्यास माजी अध्यक्ष राजेंद्र जाधव, शशिकांत मोरे, महेश बामुगडे यांच्यासह ज्येष्ठ आणि युवा पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागरिक उकाड्याने हैराण

**खांदा कॉलनी :** पनवेल परिसरात एकीकडे पानगळ झालेल्या ओसाड झाडावर उंचावर वसलेली पक्ष्यांची घरटी निसर्गाचा वेगळाच संदेश देत आहेत. स्थानिकांच्या मते, घरटी जितकी उंच तितका पाऊस अधिक पडण्याचा अंदाज व्यक्त केला जातो. दरम्यान, आकाशात काळेकुट्ट ढगांनी गर्दी केली असूनही पावसाच्या सरी मात्र अद्याप बरसलेल्या नाहीत. वाढत्या उकाड्याने नागरिक हैराण झाले असून, आता सर्वांच्या नजरा वरुणराजाच्या आगमनाकडे लागल्या आहेत. पावसाची चाहूल लागली असली तरी प्रतीक्षा मात्र, कायम आहे.





## आगरी समाज संस्थेतर्फे शैक्षणिक मार्गदर्शन

| अलिबाग | प्रतिनिधी |

विद्यार्थ्यांना योग्य करिअर दिशा मिळावी, शिक्षणातील विविध संधींची माहिती व्हावी आणि बदलत्या काळातील आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी व्हावी या उद्देशाने आगरी समाज संस्था, अलिबाग यांच्या वतीने करिअर व शैक्षणिक मार्गदर्शन अभियानाची सुरुवात शनिवारी (दि.२०) जून रोजी आयईएस शाळा, वरसोली येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन उपशिक्षणाधिकारी सुनील भोपळे यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करून करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप करण्यात आले. उपशिक्षणाधिकारी भोपळे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना यशासाठी कठोर परिश्रम, सातत्य आणि दृढ इच्छाशक्तीचे महत्त्व पटवून दिले. तर प्रमुख मार्गदर्शक मिलिंद धोदरे यांनी दहावी व बारावीनंतर उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक शाखा, व्यावसायिक अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती योजना आणि करिअरच्या अनेक पर्यायांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. याशिवाय कृत्रिम बुद्धिमत्ता (-I) या नव्या तंत्रज्ञानाची माहिती देऊन भविष्यात विद्यार्थ्यांसमोर निर्माण होणारी आव्हाने आणि त्यासाठी आवश्यक कौशल्ये याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी आगरी समाज संस्थेचे उपाध्यक्ष सुनिल तांबडकर, मार्गदर्शक अनंत म्हात्रे, उदय म्हात्रे, तुषार थळे, मनोहर पाटील, श्रेयस प्रभाकर ठाकूर यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शैक्षणिक कार्यक्रम समितीचे मिलिंद धोदरे, राजेंद्र पाटील, शुभांगी म्हात्रे, शशिकांत मिठागरी, जयवंत पाटील, प्रकाश मिठागरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सुमित्र पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात

| रेवदंडा | प्रतिनिधी |

रेवदंड्यातील सुमित्र ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी उत्साहात संपन्न झाली. यावर्षी संस्थेचे संस्थापक व माजी अध्यक्ष कमळाकर (आप्पा) साखळे यांचे निधन झाल्याने त्यांच्या आठवणींना उजाळा देताना सभागृहातील वातावरण भावुक झाले.





रेवदंडा मोठे बंदर येथील भंडारी समाज सभागृहात आयोजित सभेचे अध्यक्षस्थान पतसंस्थेचे अध्यक्ष खलिल इनुस तांडेल यांनी भूषविले. यावेळी संचालक महेंद्र नाईक, उमेश कोंडे, राजेंद्र वाडकर, अशोक हवालदार, विजय चौलकर, सदानंद घरत, प्रतिभा वरसोलकर, कमरजब्बीन मुकादम, हेमांगी साखळे, तज्ज्ञ संचालक अनीस हाजते, प्रतिभा सुर्वे, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक नागावकर, व्यवस्थापिका क्रांती जाधव यांच्यासह अनेक मान्यवर व मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी नूतन अध्यक्ष खलिल तांडेल यांचे संचालक राजन वाडकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कमळाकर साखळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी चौल व रेवदंडा परिसरातील दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच रेवदंडा ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी निवड झाल्याबद्दल संतोष सदाशिव मोरे, पाठारे क्षत्रिय समाजाचे नवनियुक्त अध्यक्ष अनंत लक्ष्मण घरत आणि थेरोंडा येथे सापडलेले सोन्याचे दागिने प्रामाणिकपणे मालकाकडे सुपूर्द करणाऱ्या सुषमा मंगेश सरपाटील यांचा विशेष गौरव करण्यात आला. अध्यक्ष खलिल तांडेल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सभा यशस्वी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक नागावकर, क्रांती जाधव, नरेश सुर्वे, विनय घरत, अल्पेश घरत, निलेश भट्टीकर, विजय टेकाळकर आदींनी विशेष परिश्रम घेतले.

---

## पावसासाठी महादेवाला साकडे

| म्हसळा | प्रतिनिधी |

यंदा पावसाने ओढ दिल्याने बळीराजासह सर्वच नागरिक चिंतेत आहेत. या पार्श्वभूमीवर, वरुणराजाला प्रसन्न करण्यासाठी आणि गावात सुख-समृद्धी नांदण्यासाठी म्हसळा येथे सोमवारी (दि.२२) श्री लखमेश्वर गाभारा भरणे व पाऊस मागणेफया पारंपरिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हिंदू ग्रामस्थ मंडळ, म्हसळा यांच्या वतीने कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. यावेळी भजन म्हणत ग्रामदैवत धावीर महाराज यांच्या मंदिरात गेले. यानंतर शंकर मंदिरामध्ये पोहोचल्यानंतर जुन्या आणि पवित्र परंपरेनुसार श्री लखमेश्वरचा गाभारा पाण्याने भरून देवाकडे सर्व ग्रामस्थ व लहान मुलानी साकडे घातले.



## पाणीपट्टी दरवाढीच्या विरोधात उबाठाचे उपोषण

| धाटाव | प्रतिनिधी |

रोहा-अष्टमी नगरपालिकेने पाणीपट्टी दरात मोठी वाढ केली आहे. ही दर वाढ सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला परवडणारी नाही. म्हणून वाढीव पाणीपट्टी दर तातडीने रद्द करा या मागणी उबाठा गटाने केली आहे. आधीच महागाईने होरपळत असलेल्या जनतेवर हा अतिरिक्त आर्थिक बोजा टाकल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष आहे. या प्रकरणावर सोमवारी (दि.२२) रोहा अष्टमी नगरपालिकेच्या परिसरात रोह्यातील ठाकरे शिवसेना चांगलीच आक्रमक झाली असून आमरण उपोषणाचे हत्यार उपसून आंदोलनाला बसले आहेत. याठिकाणी शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करीत शक्ती प्रदर्शन सुद्धा केले आहे.





शासनाने सुचवीलेल्या वार्षिक ३,६०० रुपयांच्या वाढीपेक्षा कमी म्हणजेच २,८०० रुपये दर निश्चित केल्याचा दावा नगरपालिकेने केला आहे. मात्र, शिवसेनेने ही वाढ पूर्णपणे अन्यायकारक असल्याचे म्हणत ती मागे घेण्याची मागणी केली आहे. यासाठी शिवसेनेने आक्रमक पवित्रा घेत ठाकरे सेनेचे रोहा शहरप्रमुख राजेश काफरे यांच्या नेतृत्वाखाली चंद्रकांत कडू, प्रीतम देशमुख आणि इतर प्रमुख पदाधिकाऱ्यांनी या वाढीव पाणीपट्टीविरोधात तीव्र आंदोलन उभारले आहे.

याप्रसंगी प्रसाद भोईर, नितीन वारंगे, दुर्गेश नाडकर्णी, सचिन फुलारे, अनिल माळी, मनोज भायतांडेल, सुरेंद्र मोरे, रमेश विचारे, प्रीतम देशमुख, ओंकार गुरव, भारत वाकचौरे, प्रेरित वलीवकर, स्नेहल करडे, सागर भगत , श्रद्धा पोटफोडे, मनोज लांजेकर, बाबू कडू, प्रीतम पाचंगे, प्रसन्न पिंपळे, दिलीप दांडेकर, मंदार गायकवाड, अपेंद्र सावंत, अनिकेत कोंडे, अमित कांबळे, अनिल वर्तक, अनिकेत भोसले, सौरभ धाटावकर, राकेश काफरे, नंदू भादेकर आदी उपस्थित होते.

---

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- घरकामासाठी कायमस्वरूपी राहून काम करणारी बाई हवी आहे. कामामध्ये जेवण बनवणे व घराची साफसफाई यांचा समावेश असेल. पगार : ₹ १५,०००/- राहण्यासाठी केयरटेकर रूम मिळेल. (फैमिली केयरटेकर रूम मध्ये राहू शकते.) इच्छुकांनी संपर्क साधावा. 7875866555
- आर्किटेक्चर आणि इन्टेरियर डिझाइनिंग ऑफिस करीता स्टाफ हवा आहे. संपर्क – 9762777975
- वाडगाव फाटा येथे कॉटेज सांभाळण्याकरीता माणूस हवा आहे. संपर्क – 9822938444
- अलिबाग–मुरूड रोडटच चौल–सागमळा (पिराचे देऊळ) येथे ८ गुंठा (१०.१०/७/१२) बागायत वाडी व उत्तम घर (क्लिअर टायटल) विकणे आहे. धंद्यासाठी सुद्धा उत्तम जागा आहे. संपर्क–घोसाळकर– ९८१९७७११११
- रखवालदार/सफाईकामगार पाहिजे संपर्क–८७८८०२१५१०
- ड्रायव्हर पाहिजे संपर्क – ९४२२६९४२०३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

---

दरीतून ४०० किलोच्या तोफा काढल्या बाहेर | ‘रोप रेस्क्यू’ प्रणालीचा अनोखा वापर

# अवचितगडावर ऐतिहासिक वारसाचे जतन

| रोहा | प्रतिनिधी|

दुर्गम गडकिल्ल्यांचा इतिहास आणि त्यांचा अनमोल ठेवा जतन करण्यासाठी शिवशंभो प्रतिष्ठान रोहा व सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था यांनी अवचितगड येथे एक अत्यंत थरारक आणि कौशल्याने परिपूर्ण अशी संयुक्त मोहीम शनिवारी (दि.२०) यशस्वीपणे पार पाडली आहे. या मोहिमेअंतर्गत गडाच्या अवघड दरीतून दोन ऐतिहासिक तोफांना सुरक्षितपणे वर आणून गडावर पुन्हा स्थापित करण्यात आले.

या मोहिमेची सुरुवात १२ ते १५ जून २०२६ दरम्यान शिवशंभो प्रतिष्ठानच्या सदस्यांनी राबविलेल्या गड-अभ्यास मोहिमेने झाली. या अभ्यासादरम्यान गडाच्या उत्तरेकडील बुरुजापासून सुमारे ५५० मीटर अंतरावर पहिली, तर त्यापासून अवघ्या १०० मीटर अंतरावर दुसरी अशा दोन ऐतिहासिक तोफा आढळून आल्या. इतिहासाचा हा सुवर्णकाळ डोळ्यांसमोर आणणारा ठेवा जतन करण्यासाठी सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करून शनिवारी प्रत्यक्ष संवर्धन मोहिमेला सुरुवात झाली. मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात सायंकाळी ९ वाजेपर्यंत पहिली तोफ गडावर आणण्यात यश आले. मात्र, दुसरी तोफ अतिशय खोल आणि दुर्गम दरीत असल्याने तिला वर काढणे एक मोठे आव्हान होते. या दोन्ही तोफांचे वजन प्रत्येकी अंदाजे ३५० ते ४०० किलोग्रॅम होते. या अवजड तोफेच्या स्थलांतरासाठी प्रतिष्ठानने सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेच्या प्रशिक्षित बचाव पथकाची मदत घेतली.

पथकाने आधुनिक टेक्निकल रोप रेस्क्यू प्रणाली, अचूक अँकरिंग आणि योग्य भारवाटप पद्धतीचा वापर करून अत्यंत नियोजनबद्ध रितीने ही तोफ दरीतून बाहेर काढली.

या मोहिमेविषयी बोलताना बचाव पथकाच्या प्रतिनिधींनी सांगितलेकी, हीमोहीम आमच्यासाठी एका सराव शिबिरासारखीच ठरली. यापूर्वी आम्ही खोल दऱ्या किंवा नदीपात्रातून जिवंत व्यक्ती अथवा मृतदेह बाहेर काढण्याचे काम केले आहे. जिथे वजन १५० किलोपेक्षा कमी असायचे. मात्र, अर्धा टनाच्या जवळपास वजन असलेल्या या ऐतिहासिक वस्तूची रिकव्हरी करणे हा एक नवा आणि मौल्यवान अनुभव होता. भविष्यात नैसर्गिक आपत्ती, दरड कोसळणे किंवा अवजड वाहन अपघाताच्या प्रसंगी या कौशल्याचा मोठा फायदा होईल.

या ऐतिहासिक कार्याबद्दल संपूर्ण परिसरातून आणि इतिहासप्रेमींकडून दोन्ही संस्थांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा किल्ला

कोकणात कुंडलिका नदीच्या तीरावर रोहा गावाच्या आजूबाजूला पसरलेल्या डोंगररांगांमध्ये गर्द रानाने वेढलेला किल्ला म्हणजे अवचितगड. रोह्यापासून ५ कि.मी. वर असलेल्या या गडाची उंची तळापासून ३०५ मीटर किंवा १००० फूट आहे. घनदाट जंगलामुळे जाण्याचा मार्ग दुर्गम झाला आहे. सर्व बाजूंनी तटांनी आणि बुरुजांनी वेढलेला असल्याने हा किल्ला संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा होता.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे तांबस, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक जयंतीलाल धनराज जैन मयत तर्फे वारस पृथ्वीराज जयंतीलाल जैन वै यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे तांबस, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ३३ | २/अ | ०-३६-४० | ०-४४ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २३/०६/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस व संबंधितांना कळविण्यात येते की, माझे अशिलांनी मौजे वाशीहवेली, ता. तळा, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. तालिब मोईज कारा, २) सौ. सादिया मोईज कारा, ३) सौ. आलिया मोईज कारा व ४) मोइज सदरुद्दीन कारा यांच्याकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे..

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे. | गट नं. | क्षेत्र हे.आर. | आकार (रु.) |
|---|---|---|---|
| वाशीहवेली, ता.तळा, | ६०/५ | ४.३८.०० पो.ख. ०.८१.०० एकूण = ५.१९.०० | २.५०/- |

संदर्भित जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमीची असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्यात कोणत्याही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा करार वारस, गहाण, अभिहस्तांतरण, बक्षीस, निर्वाह, कब्जा, विक्री, दान, भाडेपट्टा, धरणाधिकार, भार, वहिवाट, बोजा, न्यास, पोटगी, सुविधाधिकार, हस्तांतरण, परवाना, कुळवहिवाट, अदलाबदल, कोणत्याही तंट्यात किंवा अन्य प्रकारे क्षोभीत असल्याने कोणताही दावा असल्यास किंवा कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझेकडे खालील पत्त्यावर लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक- २१/०६/२०२६

सही /-
**(ॲड.प्रशांत एच.वर्तक)**
तथास्तु, गोकुळनगर,
रेवस बायपास रोड,
चेंढरे, अलिबाग-रायगड

## शुद्धीपत्रक

तारीख १५/०६/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसमध्ये जिल्हा रायगड. तालुका अलिबाग पैकी गांव बामणसुरे येथील गट नंबर ३१ हिस्सा नंबर १ या मिळकतीतून ६० मीटर रूंद व ४०० मीटर लांबीचा वहिवाटीचा रस्ता या मजकूराऐवजी गट नंबर ३१ हिस्सा नंबर १ या मिळकतीतून ६ मीटर रूंद व ४० मीटर लांबीचा वहिवाटीचा रस्ता असे वाचण्यात यावे.

तारीख : २३/०६/२०२६

सही/-
**ॲड.संजीव अनिल घरत**
मु.पो.खंडाळे,
तालुका अलिबाग, जिल्हा रायगड.
मोबाईल: ९९२१५५२६७७

## जाहीर नोटीस

या जाहिर नोटीशीद्वारे सर्वांना कळविणेत येते की, खालील नमुद मिळकतीचे मालक श्री. गोपीनाथ सदाशिव जंगम यांनी त्यांची खालील नमुद मिळकत आमचे अशिलांना विकत देणेचे ठरविले आहे.

**मौजे खांडपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| भुमापन क्रमांक | भुमापन क्र.चा उपविभाग | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ३१ | ६ | ०-३५-१० पो.ख. ०-१०-५० | २-६२ |
| | | एकूण ०-४५-६० | |

वरील नमूद मिळकत व त्यामधील तदंगभुत हक्कहितसंबंध सुद्धा.

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वगैरे स्वरुपाचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन चौदा दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरुन आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक रहाणार नाही हे कळावे.

दि. २२ जून, २०२६

सही/-
खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. सारिका भास्कर मुने**
ऑफिस पत्ता-स्वप्नगरी, शॉप नं.९
गुरुनगर रोड, मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि.रायगड
मो.नं.७०३०५४४७८८/८७६६५०३०१९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे - सोनखार, ता. पेण, जि. रायगड येथील सामाईक शेत जमीन मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदरहू सामाईक शेत जमीन मिळकतीचा व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास सामाईक शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक अनुक्रमे १) कल्पेश मंगेश पाटील, २) प्रणाली मंगेश पाटील, ३) माधुरी दत्ताराम म्हात्रे, ४) सरोज दत्ताराम म्हात्रे, ५) मिनल दत्ताराम म्हात्रे, सर्व रा.मु.पो.सोनखार, ता. पेण, जि. रायगड यांनी अनुमती दिलेली आहे. सदरच्या सामाईक शेत जमिन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

**शेतजमीन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु.पै.) |
|---|---|---|---|
| सोनखार | २१/१/ब | जिरायत ०.९७.४० पो.ख.०.०२.०० एकूण क्षेत्र ०.९९.४० | १६.१८ |

**वरील सामाईक शेत जमीन मिळकतीचे एकूण क्षेत्र म्हणजेच ०.९९.४० हे.आर. चौ.मी. यापैकी ०.२७.०० हे.आर.चौ.मी. (२७.०० गुंठे) क्षेत्र या जाहीर नोटीसचा विषय आहे.**

वरील वर्णनाची सामाईक शेत जमीन मिळकत पूर्णतः हा निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या सामाईक शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरच्या सामाईक शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरची सामाईक शेत जमीन मिळकत ही पूर्णपणे निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे विद्यमान मालकांसोबत वरील शेत जमीन मिळकतीच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू सामाईक शेत जमीन मिळकती पैकी क्षेत्राचा खरेदी व्यवहार हा रजि. खरेदीखताने पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण रायगड
दिनांक २३/०६/२०२६
संपर्क - सलाम तांडेल,
मो.नं. ७०३८४४१११८

अशिलांचे वकील
**ॲड. श्री.जयंत घ.वैरागी**
ऑफिस :-"वैरागी व्हिला",
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे शिर्की, ता. पेण जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. शांताराम किसन घुले यांनी त्याचे नमुद विद्यमान आशा महादेव पाटील व इतर यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| शिर्की | ६२ | ०.१९.४० पो.ख.०.००.८० एकुण क्षेत्र ०.२०.२० | ३.०० |
| शिर्की | १९८ | ०.६४.०० पो.ख.०.०१.८० एकुण क्षेत्र ०.६५.८० | ७.९४ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिप:- सदर नोटीस खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण:- पेण
दि. २२/०६/२०२६

**ॲड. हेमा.ज.पाटील (घोडिंदे)**
पेण पोलिस स्टेशन जवळ
तहसिल ऑफिस आवारात, कोटआळी पेण
मो.नं. ९८२२०३०३८९

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक रुपा प्रदिप नाईक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तदनंतर येणा-या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव, ता.अलिबाग | ८०६ | क्षेत्र ०-०४-६० पो.ख. ०-००-८० एकूण क्षेत्र ०-०५-४० | १.०० |

दिनांक :- २२/०६/२०२६

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता:- फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. नं. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक सोनाली दिलीप आचरेकर यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| नागांव, ता.अलिबाग | २३६३ | ०-१५-३० बागायत ०-०३-७० पो.ख. ०-१९-०० एकुण | ७.१६ |

**वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये सोनाली दिलीप आचरेकर यांच्या नावे असणारे एकुण क्षेत्र ०-११-०० हे. आर., आकार ५ रू १५ पैसे हि जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.**

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक २२/०६/२०२६

**ॲड. राहूल रमेश नाईक**
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेणेच्या ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

| अ. क्र. | मौजे | गट नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १ | चेंढरे | ८७/३/क /३/ड/९ | ०-०१-५९ | १५.९० |

वर नमुद वर्णनाच्या मिळकती या निर्वेध व निंजोखीम असल्याची खात्री विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना करून दिलेली आहे. या गोष्टीची पडताळणी करणेकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करणेत येत आहे.

तरी सर्व लोकांस असे कळविणेत येते की, वर नमुद केलेल्या मिळकतीमध्ये विद्यमान मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचेही साठेकरार खरेदीखत दान, लिन, बक्षीसपत्र, वहीवाट वगैरे अन्य कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यासंबंधी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह आपली लेखी हरकत खाली सही करणार यांचेकडे पंधरा दिवसांचे आत आणून द्यावी. सदर विहीत मुदतीत जर कुणाचीही कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे तसेच मुळ मालकांकडे न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व निंजोखीम आहे असे समजून आमचे अशिल सदर विद्यमान मालकांबरोबर खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील अशा परिस्थितीत मग मागाहून येणारी कोणाचीही कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

अलिबाग
दि. २२/०६/२०२६

सही/-
**श्री. संतोष एकनाथ म्हात्रे**
ॲडव्होकेट
"देवगिरी", कामत आळी,
अलिबाग - रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझ्या पक्षकार सौ. वैशाली विनय जोशी हया मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक ५३, उपविभाग १५, क्षेत्र ००–१२–०० हे. आर. ही शेत जमिन मिळकत, श्री. भगवान गणपत पाटील हयांच्याकडून खरेदी करु इच्छितात. सदरहू शेत जमिन ही श्री. जैतु पांडुरंग कोळंबे, श्री. लक्ष्मण पांडुरंग कोळंबे, श्री. काशिनाथ पांडुरंग कोळंबे व श्री. पंढरीनाथ अनाजी कोळंबे हयांची वडिलोपार्जित मिळकत होती. ती त्यांनी श्री राहुल लालमन गोयल हयांना दिनांक ०३/०४/२००८ च्या नोंदणीकृत खरेदीखताअन्वये विकली, जी श्री. राहुल लालमन गोयल यांनी पुष्पक लॅड प्रायव्हेट लि. यांना दिनांक १०/०७/२००८ च्या नोंदणीकृत खरेदीखताअन्वये विकली. त्यानंतर सदरहू शेतजमिन पुष्पक लॅड प्रायव्हेट लि. यांनी श्री. भगवान गणपत पाटील यांना दिनांक १६/०९/२०११ च्या नोंदणीकृत खरेदीखताअन्वये विकली.

जर कोणा व्यक्तीस सदरहू शेतजमिनीच्या नियोजित खरेदी बाबत कोणतीही हरकत किंवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध किंवा अधिकार असेल, तर तशी लेखी हरकत, सबळ लेखी पुराव्या सहित, ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे तळ मजला, मेधा हाऊस, रेशनिंग ऑफिसच्या समोर, कोर्ट नाका, ठाणे (प.) ४००६०१ या पत्त्यावर नोंदवावी. अन्यथा अशी हरकत नाही किंवा सोडून दिली आहे, असे समजले जाईल व त्यानंतर अशी हरकत विचारात घेतली जाणार नाही.

ठिकाण : ठाणे
दिनांक : २२/०६/२०२६

सहि/—
ॲड. रजनी पाठक

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

### ई-निविदा सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे, विभागीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांनी पुढील कामासाठी ई-ओपन टेंडरची आमंत्रणे दिलेली आहेत.

**अ.क्र. 1, कामाचे नाव** – कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागांतर्गत विविध स्थानकांवरील बोअरवेल / खुल्या विहिरीमधील विद्यमान पंप काढून टाकून सौर पंप प्रणालीचा पुरवठा, प्रतिष्ठापन, चाचणी व कार्यान्वयन करणे. **टेंडर क्रमांक : केआर/आरएन/ईएल/टी/15/2026 दिनांक 23/06/2026, अंदाजित खर्च** – ₹ 30,00,046/- (जीएसटी वगळून), **टेंडर फॉर्म शुल्क** – नाही, **ईएमडी** – ₹ 60,000/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 14/07/2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

**अ.क्र. 2, कामाचे नाव** – कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील कलंबणी टीएसएस येथे विद्यमान ॲल्युमिनियम फीडरच्या जागी कॉपर फीडर बदलणे. **टेंडर क्रमांक : केआर/आरएन/ईएल/टी/16/2026 दिनांक 23/06/2026, अंदाजित खर्च** – ₹ 23,74,758/- (जीएसटी वगळून), **टेंडर फॉर्म शुल्क** – नाही, **ईएमडी** – ₹ 47,500/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 14/07/2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

अधिक माहितीसाठी विभागीय विद्युत अभियंता, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी अथवा रेल्वे संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) संपर्क साधावा.

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री. रविंद्र लक्ष्मण करमेळे, राहणार सातिर्जे, ता. अलिबाग, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकतीपैकी ०-२२-०० (हे.आर) जमिन मिळकत रस्त्याच्या हक्कासहीत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरित झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. रविंद्र लक्ष्मण करमेळे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| सातिर्जे, ता. अलिबाग, | १७३/१/७ | ०-४७-३० ०-०७-७० पो.ख. ०-५५-०० एकूण | १०-९८ |

सदर शेतजमिन मिळकतीपैकी पश्चिमेकडील ०-२२-०० आर्स शेतजमिन मिळकत.

अलिबाग
दिनांक : २२/०६/२०२६

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड
खरेदीदाराचे वकील

## जाहीर सुचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील १) सौ. विद्या दिपक जाधव. २) श्री. दिपक नामदेव जाधव. रा. १४०५, मेपल रुनवाल ग्रीन, मुलुंड, गोरेगांव लिंक रोड, नाहुर, मुलुंड (पश्चिम) मुंबई ४०००७८ यांनी खालील नमूद शेतजमिन मिळकत त्याचे मालक श्री. भगवान अनंता जाधव रा. जिते, ता. कर्जत जि. रायगड यांचेकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे - जिते, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे-आर-पॉ. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| ८४ | ३ | ०-०२-०० पो.ख. ०-००-०० एकूण ०-०२-०० | ०-०६ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक २३ जून २०२६

**प्रांजली प्रथमेश मोरे**
एम.ए.एलएल् बी.
अधिवक्ता एन्रोलमेंट क्रमांक
(एमएएच/५०८१/२०२१)
७, तळ मजला, जय नारायण कॉम्प्लेक्स,
अंबिका नाका, मु.पो. नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक श्री. संतोष विष्णू म्हात्रे यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे - चिंचवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| भुमापन क्र. | उपविभाग क्र. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकारणी रु.-पै |
|---|---|---|---|
| २६ | १०/अ | ०.०५.०० पो.ख.०.००.०० | ०.०५ |
| २६ | ११/अ | ०.०४.०० पो.ख.०.००.०० | ०.०५ |
| २६ | ७/ब | ०.१६.०० पो.ख.०.००.०० | ०.२० |
| २६ | ८/ब | ०.१६.०० पो.ख. ०.०१.०० | ०.२० |
| १२ | ५/ब | ०.४३.०० पो.ख. ०.०४.०० | ०.३० |
| १६ | १/क | ०.०६.१० पो.ख. ०.०१.६० | ०.३५ |
| १६ | ४/अ | ०.४७.८० पो.ख. ०.०६.१० | ०.८० |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक २३/०६/२०२६

**ॲड. मोनाली रामदास हजारे**
पत्ता: ललानी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९२६०१०९२८२


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक अनिता नरेश राजानी यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक / भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १०९/१/ड | ००-२६-५० | ०१.४४ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २१ जुन २०२६

**ॲड. शरद आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ.हौ.सो.लि.कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

दि.२३/०६/२०२६

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मौजे कडाव, तलाठी सजा कडाव, ता. कर्जत. जि. रायगड. येथील ग्रामपंचायत कडाव हद्दीतील जमीन मिळकत सर्व्हे नं. १०३/१/क/१, ज्याचे क्षेत्रफळ ०१-२६-०० हे.आर.प्रति, ही शेतजमीन स्वरूपाची वडीलोपार्जित मिळकत नाना बाबू पवाळी व इतर २६ सर्व राहणार-मु. कडाव ता. कर्जत जि रायगड. यांचे मालकीची असून महसूल दप्तरी मालक म्हणून सातबारा उताऱ्यावर त्यांची व त्यांचे वारसांची नावे आहेत. सदर शेतजमिन नाना बाबू पवाळी व इतर २६ यांनी श्री. मधुकर बाळकृष्ण पाटील व श्री. विजय भिवा खाणे यांना दि. ३१/०५/२०११ रोजी मा. दुय्यम निबंधक कर्जत यांचे कार्यालयात साठेखत क्र.४८३५/२०११ अन्वये नोंदणीकृत करून दिली आहे. सदर शेतजमीनीचे खरेदीखत नोंदणी होणार आहे.

सदर जाहिर नोटिसीद्वारे असे जाहिर करीत आहे की, वर नमूद केलेली जमीन मिळकतीसंबंधी कोणीही व्यक्तीने अथवा ७/१२ संबंधित मालकाने अथवा त्याच्या वतीने इतर तिऱ्हाईत व्यक्तीने खरेदीखत, साठेखत, गहाण, दान, कब्जा, तारण, भाडेपट्टा व इतर कोणत्याही प्रकारचा बोजा हक्क करू नये अन्यथा वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीशी कोणीही व्यक्तीने कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो रद्दबातल ठरेल व सदर जाहिरात पुरावा म्हणून मा. दिवाणी न्यायालयात दाखल केली जाईल याची नोंद घ्यावी.

ऑफीसचा पत्ता-
१५७८, गाळा नं.००१, ऐश्वर्यालक्ष्मी अपार्टमेंट,
आशिष सिनेमाजवळ, पद्मानगर, भिवंडी जि. ठाणे.
मोबा. ९८९०४३४४७१

सही/-
**ॲड. योगेश मधुकर जाधव**
Regd. No. MAH/6389/2016

सही / -
श्री.विजय भिवा खाने

## जागृती शिक्षण प्रसारक मंडळ, पेडली

र. नं. इ-१२० कुलाबा दि. १३-३-१९७०
बिल्डिंग नं. २८३, मिलिंद निवास, स्टेट बँक जवळ मुं. पेडली, पो. तिवरे, ता. सुधागड, जि. रायगड - ४१०२०५

जा.क्र.-जा.शि.प्र.मं/७०/२०२६ — दिनांक- २२/०६/२०२६

**"वसतिगृह कर्मचारी रिक्त पदे (सन२०२६-२७)"**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय मंत्रालय मान्यता प्राप्त वसतिगृह जागृती शिक्षण प्रसारक मंडळ, पेडली संचलित

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह, पेडली मु. पेडली, पो. तिवरे, ता. सुधागड, जि. रायगड - ४१०२०५
२) बी.सी.वसतीगृह, नाडसूर ता.सुधागड, जि. रायगड
३) कुणबी विद्यार्थी वसतीगृह, चंदरगाव ता. सुधागड, जि.रायगड

वरील वसतीगृहात अधीक्षक, स्वयंपाकी व पहारेकरी पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत रिक्त पदे व शैक्षणिक पात्रता

१. अधीक्षक
- किमान १० वी उत्तीर्ण.
- अनुभव असल्यास प्राधान्य.

१. स्वयंपाकी
- किमान ८ वी उत्तीर्ण.
- महिला उमेदवारांना प्राधान्य.

१. पहारेकरी
- किमान ८ वी उत्तीर्ण.
- अनुभव असल्यास प्राधान्य.

सुधागड तालुक्यातील उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल
उमेदवारांनी या व्हॉट्सअप क्रमांकावर अर्ज पाठवावे: ७०३०१३१३८३
टीप : सदर पदे मानधन तत्त्वावर आहेत

सही/-
सचिव
**जागृती शिक्षण प्रसारक मंडळ, पेडली,**
**ता.सुधागड, जि.रायगड. महाराष्ट्र - ४१०२०५.**

## जागृती शिक्षण प्रसारक मंडळ, पेडली

र. नं. इ-१२० कुलाबा दि. १३-३-१९७०
बिल्डिंग नं. २८३, मिलिंद निवास, स्टेट बँक जवळ मुं. पेडली, पो. तिवरे, ता. सुधागड, जि. रायगड - ४१०२०५

जा.क्र - जा. शि.प्र.मं/७१/२०२६ — दिनांक - २२/०६/२०२६

**"वसतिगृह प्रवेश (सन२०२६-२७)"**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय मंत्रालय मान्यताप्राप्त वसतिगृहे जागृती शिक्षण प्रसारक मंडळ, पेडली संचलित

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह, पेडली मु.पेडली, पो.तिवरे, ता.सुधागड, जि.रायगड - ४१०२०५
२) बी.सी.वसतीगृह, नाडसूर ता.सुधागड, जि.रायगड
३) कुणबी विद्यार्थी वसतीगृह, चंदरगाव (ता.सुधागड, जि. रायगड)

सन २०२६ - २७ या शैक्षणिक वर्षासाठी वरील वसतिगृहांमध्ये SC, ST, VJNT, OBC, SEBC तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्रवेश सुरू आहेत. सुविधेचा लाभ घेऊन त्वरित प्रवेश निश्चित करावा. आमच्या वसतिगृहातील सुविधा

- मोफत प्रवेश
- इयत्ता ५ वी ते १० वी विद्यार्थ्यांसाठी निवासी सुविधा
- मोफत - (इंटरनेट) सुविधा
- मोफत पौष्टिक व दर्जेदार भोजन
- सीसीटीव्ही (CCTV) सुरक्षा व्यवस्था
- २४ तास वीज व शुद्ध पाणी पुरवठा
- स्वच्छ, सुरक्षित व शिस्तबद्ध वातावरण
- अभ्यासासाठी अनुकूल वातावरण

संपर्क : ८९८३२५६१०१/७०३०१३१३८३

आपला विश्वासु
सही/-
सचिव
जागृती शिक्षण प्रसारक मंडळ, पेडली,
ता.सुधागड, जि.रायगड. महाराष्ट्र-४१०२०५.

# आशियाई रिले चॅम्पियनशिप
# भारताला सुवर्णपदक

**१०० मीटर रिलेमध्ये चीनला हरवले**
**भारताने एकूण ३ पदके जिंकली**

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय महिला ४१०० मीटर रिले संघाने एशियन रिले चॅम्पियनशिप २०२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले आहे. अंतिम सामन्यात भारतीय संघाने चीनला हरवून ४३.८५ सेकंदांची हंगामातील सर्वोत्तम वेळ नोंदवली. या चॅम्पियनशिपमध्ये भारताने १ सुवर्ण, १ रौप्य आणि १ कांस्य पदकासह एकूण ३ पदके पटकावली आहेत.संघात श्रावणी नंदा, एसएस स्नेहा, सुदेष्णा शिवंकर आणि तमन्ना यांचा समावेश होता. या चौघांनी शर्यतीदरम्यान अचूक बॅटन एक्सचेंज आणि उत्कृष्ट फिनिशिंग स्पीडचे प्रदर्शन केले.



**थायलंडने कांस्यपदक जिंकले**

भारताने ४३.८५ सेकंदांच्या वेळेसह पहिले स्थान पटकावले. या शर्यतीत चीनचा संघ ४४.०९ सेकंदांसह दुसऱ्या स्थानावर राहिला आणि त्याने रौप्यपदक जिंकले. तर थायलंडने ४४.११ सेकंदांची वेळ नोंदवून कांस्यपदक पटकावले. रिलायन्स फाउंडेशनचे प्रशिक्षक मार्टिन ओवेन्स यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने ही शर्यत योजना यशस्वीरित्या पूर्ण केली.

या चॅम्पियनशिपमध्ये भारतासाठी तमन्ना आणि स्नेहा शानुवल्ली यांची वैयक्तिक कामगिरी उत्कृष्ट राहिली, त्यांनी प्रत्येकी दोन पदकांसह आपली मोहीम संपवली. महिला ४१०० मीटरमध्ये सुवर्णपदक जिंकण्यापूर्वी, या दोन्ही खेळाडूंनी मिक्स्ड ४१०० मीटर रिलेमध्येही देशाला कांस्यपदक मिळवून दिले होते.

मिक्स्ड संघात त्यांच्यासोबत अनिमेष कुजूर आणि प्रणव गुरव यांचा समावेश होता, ज्यांनी ४१.२७ सेकंदांची वेळ नोंदवून तिसरे स्थान पटकावले. या स्पर्धेत थायलंड (४१.१४ सेकंद) पहिल्या आणि चीन (४१.२९ सेकंद) दुसऱ्या स्थानावर राहिला.

भारताला स्पर्धेतील तिसरे पदक मिक्स्ड ४४०० मीटर रिले स्पर्धेत मिळाले. या संघात तीर्थेश पी शेट्टी, एमआर पूवम्मा, भारत श्रीधर आणि नीरू पाठक यांचा समावेश होता. भारतीय चौकडीने ३:१७.०६ सेकंदांच्या वेळेसह शर्यत पूर्ण केली आणि रौप्य पदकावर कब्जा केला. या स्पर्धेचे सुवर्णपदक व्हिएतनामच्या संघाने जिंकले. स्प्रिंट स्पर्धांमधील यशानंतर भारताला ४४०० मीटर रिले स्पर्धेत पदक गमवावे लागले. महिलांच्या ४४०० मीटर रिलेमध्ये एमआर पूवम्मा, रशदीप कौर, अनसा बाबू आणि सलोनी नागर यांचा संघ ३:३४.८८ सेकंदांच्या वेळेसह चौथ्या स्थानावर राहिला. या स्पर्धेचे सुवर्णपदक व्हिएतनामने (३:३१.१६ सेकंद) जिंकले. तर, पुरुषांच्या ४४०० मीटर रिलेमध्ये तीर्थेश पी शेट्टी, अविनाश कुमार, सूरज अलगार राजा आणि भारत श्रीधर यांचा संघ ३:०५.३३ सेकंदांच्या वेळेसह पाचव्या स्थानावर राहिला. या शर्यतीतही व्हिएतनामच्या संघाने आपले वर्चस्व कायम ठेवत सुवर्णपदक जिंकले.

## निवडक

### अंजली भागवतला कांस्यपदक

**नाशिक :** जर्मनीतील सुहल येथे सुरू असलेल्या आयएसएसएफ ज्युनियर वर्ल्ड शूटिंग चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेत अंजली भागवतने प्रथमच सहभाग घेत कांस्यपदक मिळविले. या कामगिरीने अंजलीच्या नावाचा गवगवा होत असून अंजलीच्या या कामगिरीचा तिच्या पालकांनाही अभिमान वाटत आहे. नाशिक येथील भिष्मराज बाम मेमोरियल शूटिंग रेंज आणि द एक्स-एल टार्गेट शूटर्स असोसिएशनची




अंजली महेंद्र भागवत ही खेळाडू आहे. अंजलीने वैयक्तिक पात्रता फेरीत उत्कृष्ट नेमबाजी करुन अंतिम फेरीसाठी पात्र ठरणाऱ्या अव्वल ८ खेळाडूंमध्ये सातवा क्रमांक मिळवला. यानंतर झालेल्या अंतिम फेरीत अंजलीने दमदार लढत देत सहावे स्थान पटकावले. वैयक्तिक पदक थोडक्यात हुकले असले तरी भारतीय संघातील इतर दोन सहकाऱ्यांसह अंजलीच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे भारताने २५ मीटर पिस्तूल महिला ज्युनियर सांघिक स्पर्धेत १७१३ गुणांसह तिसरे स्थान मिळवत कांस्यपदकावर नाव कोरले. भारताच्या संघात अंजली महेंद्र भागवत, परिशा गुप्ता आणि निथिला आयव्ही डार्लिंग ख्रिस्तोफर यांचा समावेश होता. स्पर्धेच्या अधिकृत निकालानुसार भारताने तिसरा क्रमांक पटकावला. अंजलीचे वडील महेंद्र भागवत हे क्रीडाप्रेमी आहेत.




### भारतीय महिला हॉकी संघ बनला चॅम्पियन

**नवी दिल्ली :** भारतीय महिला हॉकी संघाने चार वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर एफआयएच नेशन्स कपचे जेतेपद पटकावले आहे. २०२२ मधील पहिल्या हंगामात चॅम्पियन बनल्यानंतर, आता २०२६ मध्ये भारतीय संघाने यजमान न्यूझीलंडला अंतिम सामन्यात पराभूत करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. या ऐतिहासिक विजयासोबतच भारतीय महिला संघाने एफआईएच हॉकी प्रो लीगसाठी देखील क्वालिफाय केले आहे. पहिल्या सत्रातच भारतीय संघाने घेतले आघाडीभारताने सामन्याच्या पहिल्या क्वार्टरमध्येच आघाडी घेतली होती; नवनीत कौरने चौथ्या मिनिटाला तर टोप्पो या खेळाडूने १५ व्या मिनिटाला गोल डागला. यानंतर सुनेलिता टोप्पो हिने गोल करत संघाला निर्णायक आघाडी मिळवून दिली. दरम्यान, या विजयानंतर एफआईएच प्रो लीग २०२४-२५ मध्ये शेवटच्या स्थानावर राहिलेल्या भारतीय महिला हॉकी संघाने आताच्या हंगामासाठी क्वालिफाय केले आहे. ही स्पर्धा २०२८ मध्ये होणाऱ्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकसाठी क्वालिफायर असणार आहे. त्या दृष्टीने टीम इंडियासाठी हा विजय अत्यंत महत्त्वाचा आणि मोलाचा मानला जात आहे.




### विराट कोहली- बुमराहचे पुनरागमन

**नवी दिल्ली :** अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेला दुखापतीमुळे मुकल्यानंतर, आगामी इंग्लंड दौऱ्यातील वन-डे मालिकेसाठी विराट कोहलीचा भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने संघाची घोषणा केली. भारत आणि इंग्लंड यांच्यात १४ जुलै, १६ जुलै आणि १९ जुलै रोजी तीन वन-डे सामने खेळवले जाणार आहेत. वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहचेही वन-डे संघात पुनरागमन झाले आहे. बीसीसीआयच्या वर्कलोड मॅनेजमेंटचा भाग म्हणून त्याला अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी आणि तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेतून विश्रांती देण्यात आली होती. आयपीएल फायनल दरम्यान कोहलीच्या पायाचे स्नायू दुखावले होते, ज्यामुळे त्याला अफगाणिस्तानविरुद्धच्या वन-डे मालिकेतून बाहेर पडावे लागले होते. ऑलराउंडर अक्षर पटेलने देखील अफगाणिस्तान मालिकेनंतर वन-डे संघात पुनरागमन केले आहे. मात्र, इंग्लंड दौऱ्यासाठी यशस्वी जयस्वाल आणि मोहम्मद सिराज यांना संघात स्थान मिळालेले नाही.गुरनूर ब्रारने संघात आपले स्थान कायम राखले आहे. प्रिन्स यादवला वगळण्यात आले असून हर्षित राणाचे संघात पुनरागमन झाले आहे. आयर्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेलाआयपीएल २०२६ दरम्यान पायाला झालेल्या दुखापतीतून वरुण चक्रवर्ती अजून पूर्णपणे सावरलेला नाही, त्यामुळे तो आयर्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेला मुकणार आहे.

### नीरज चोप्राचा दमदार कमबॅक

**मुंबई :** दोन वेळचा ऑलिम्पिक पदक विजेता नीरज चोप्राने दुखापतीतून पूर्णपणे सावरल्यानंतर दमदार कामगिरी केली आहे. दोहा डायमंड लीगमध्ये आपल्या दुसऱ्या प्रयत्नात ८२.७७ मीटर भाला फेकून, ८२.६१ मीटरचा पात्रता निकष पार केले. यासह त्याने राष्ट्रकुल खेळ २०२६ मध्ये आपले स्थान निश्चित केले. त्याचा पहिला प्रयत्न फाऊल झाला होता, पण त्याने आपला दुसरा प्रयत्न यशस्वीरित्या पूर्ण केला. यासह , तो दोहा डायमंड




लीग २०२६ मध्ये चौथ्या स्थानावर राहिला. नीरजने या स्पर्धेत ८५.६९ मीटरचा सर्वोत्तम भालाफेक केला. पाठीच्या दुखापतीमुळे नीरज चोप्रा गेल्या वर्षभरापासून कोणत्याही स्पर्धेत सहभागी होत नव्हता. या दुखापतीतून सावरल्यानंतर तो २५ मे पासून स्वित्झर्लंडमध्ये सराव करत होता. नीरज चोप्राने अगदी शेवटच्या क्षणी दोहा डायमंड लीगमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला होता. या स्पर्धेत नीरज चोप्राची स्पर्धेची सुरुवात खराब झाली, त्याने पहिल्याच प्रयत्नात फाऊल केला. त्यानंतर त्याने दुसऱ्या फेरीत ८२.७७ मीटरचा थ्रो करून आपली पहिली वैध नोंद केली. त्याची सर्वोत्तम कामगिरी तिसऱ्या फेरीत झाली, जेव्हा त्याने ८५.६९ मीटरचा थ्रो केला, ज्यामुळे तो काही काळासाठी तिसऱ्या स्थानावर पोहोचला.

## दुसरा कसोटी सामना
## न्यूझीलंडने २५३ धावांनी जिंकला

। लंडन । वृत्तसंस्था ।

दुसऱ्या कसोटी सामन्यात न्यूझीलंडने इंग्लंडला २५३ धावांनी हरवले. लंडनच्या ओव्हल मैदानावर खेळल्या गेलेल्या मालिकेतील दुसऱ्या सामन्याच्या पाचव्या दिवशी ४६३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या इंग्लंडच्या संघाने दुसऱ्या डावात केवळ २०९ धावाच केल्या. न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज मॅट हेन्रीने कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी करत एकूण ११ बळी घेतले. या विजयासह न्यूझीलंडने मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली.



पराभवासह इंग्लंडसाठी आयसीसीकडूनही वाईट बातमी आली. धीम्या गोलंदाजीच्या दरामुळे इंग्लंडवर मॅच फीच्या ५०% दंड आकारण्यात आला आणि वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेतून त्याचे १२ गुण कापण्यात आले.

इंग्लंडला विजयासाठी पाचव्या दिवशी २८१ धावांची गरज होती, तर त्यांचे पाच विकेट शिल्लक होते. चौथ्या दिवसाचा खेळ ५ विकेट गमावून १८२ धावांवर संपला होता. अंतिम दिवशी इंग्लंडचा डाव अवघ्या एका तासात आटोपला.इंग्लंडची शेवटची आशा अंतरिम कर्णधार जो रूट होते, जे चौथ्या दिवशी ७५ धावांवर नाबाद परतले होते. खेळ सुरू झाल्यानंतर अवघ्या आठ मिनिटांनी मॅट हेन्रीच्या आत येणाऱ्या चेंडूवर ते एलबीडब्ल्यू झाले. रूट आपल्या धावसंख्येत फक्त दोन धावांची भर घालू शकले आणि ७७ धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतले.रूट बाद होताच इंग्लंडची खालची फळी पूर्णपणे कोसळली. जोफ्रा आर्चर, मॅट फिशर आणि जोश टंग खाते न उघडता मॅट हेन्रीचे बळी ठरले. पदार्पण करणाऱ्या जॉर्डन कॉक्सने काही आकर्षक फटके मारले, पण त्याची खेळी जास्त काळ टिकली नाही आणि तो हेन्रीच्या चेंडूवर बोल्ड झाला.

## हरमनप्रीत कौरचा विश्वविक्रम

। इंग्लंड । वृत्तसंस्था ।

भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हीने वर्ल्ड क्रिकेटमध्ये एका विक्रमाची नोंद केली आहे. आतापर्यंत जगातील पुरूष किंवा महिला खेळाडू करू शकलेला नाही. वुमन्स टी २० वर्ल्डकप स्पर्धेत दक्षिण अफ्रिकेविरुद्धचा सामना हरमनप्रीत कौरसाठी खास आहे. हा हरमनप्रीत कौरचा २०० टी २० आंतरराष्ट्रीय सामना असून जगातील पहिली क्रिकेटपटू ठरली आहे.

मॅन्चेस्टर येथे भारत आणि दक्षिण अफ्रिका संघ आमनेसामने आले आहेत. या स्पर्धेतील महत्त्वाचा सामना आहे. इतकंच काय तर हरमनप्रीत कौरच्या कारकिर्दीसाठी संस्मरणीय असणार आहे.

जवळपास १७ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीत चांगल्या खेळीसह फिटनेस सांभाळत हा २०० सामन्यांचा पल्ला गाठला आहे. हरमनप्रीत




कौरने २०० व्या सामन्यात एक वर्तुळ पूर्ण केलं आहे. २००९ मध्ये इंग्लंडमध्येच टी २० वर्ल्डकप स्पर्धेत हरमनप्रीत कौरने आंतरराष्ट्रीय टी २० करिअरची सुरूवात केली होती. आता २०२६ मध्ये १०वं पर्व सुरू असून इंग्लंडमध्येच स्पर्धा होत आहे. या भूमीत हरमनप्रीतने २००वा सामना खेळत इतिहास रचला.हरमनप्रीत कौर चांगल्या फॉर्मात असून मागच्या वर्षी तिच्या नेतृत्वात भारताने वनडे वर्ल्डकप स्पर्धेत जेतेपद मिळवलं होतं.

## किरॉन पोलार्डचा मैदानावर राडा

। अमेरिका । वृत्तसंस्था ।

सध्या अमेरिकेमध्ये मेजर क्रिकेट लीगची धूम सुरू आहे. मात्र, वेस्ट इंडिजचा दिग्गज अष्टपैलू खेळाडू किरॉन पोलार्ड सध्या दोन वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत आला आहे. तो एमआय न्यूयॉर्क संघाकडून खेळत असून, सामन्यादरम्यान भारतीय वंशाचा मराठी क्रिकेटपटू शुभम रांजणे याच्यासोबत मैदानात त्याची चांगलीच बाचाबाची झाली. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. तर दुसरीकडे, पोलार्डने टी-२० क्रिकेटमधील मोठा विक्रम करताना वेस्ट इंडिजच्या दिग्गज ख्रिस गेलची माफी मागितली आहे.




सामन्याबद्दल सांगायचे झाले तर, टेक्सास सुपर किंग्सने प्रथम फलंदाजी करताना १५८ धावा केल्या. शुभम रांजणेने ४९ धावांची महत्त्वाची खेळी केली, तर मिलिंद कुमारनेही साथ दिली. मात्र, इतर फलंदाज अपयशी ठरले. प्रत्युत्तरात एमआय न्यूयॉर्कने निकोलस पूरनच्या ६८ धावांच्या खेळीच्या जोरावर १४ चेंडू आणि ८ विकेट्स राखून सामना सहज जिंकला.

मैदानावरील या वादानंतर किरॉन पोलार्डने टी-२० क्रिकेटच्या इतिहासात मोठा विक्रम केला. वॉशिंग्टन फ्रीडमविरुद्धच्या सामन्यात त्याने ५६ चेंडूंमध्ये नाबाद १०० धावांची तुफानी खेळी केली. या शतकी खेळीदरम्यान त्याने टी-२० क्रिकेटमध्ये १४,५८२ धावांचा टप्पा गाठत ख्रिस गेलचा तब्बल १२ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला.

पोलार्ड या यादीत अव्वल स्थानावर पोहोचला आहे. आपल्याच देशातील आणि टी-२० क्रिकेटमधील महान खेळाडूचा विक्रम मोडल्यामुळे पोलार्ड भावूक झाला. सामन्यानंतर तो हसत कॅमेऱ्यासमोर म्हणाला, ख्रिस गेल आमच्यासाठी कायमच प्रेरणास्थान राहिला आहे. त्याने टी-२० क्रिकेटला एका वेगळ्याच उंचीवर नेले आहे. त्यामुळे तुझा विक्रम मोडण्याचा माझा कोणताही चुकीचा हेतू नव्हता, पण हा पराक्रम करताना खूप आनंद होत आहे.

## ऑस्ट्रेलियाने मालिका ३-० ने जिंकली
### ७ गडी राखून पराभव; मिचेल मार्शचे अर्धशतक

। चट्टोग्राम । वृत्तसंस्था ।

ऑस्ट्रेलियाने तिसऱ्या टी-२० मध्ये यजमान बांगलादेशला ७ गडी राखून हरवले. यासह ऑस्ट्रेलियाने क्लीन स्वीप करत मालिका ३-० ने जिंकली.

बांगलादेशचा कर्णधार तौहीद ह्दोयने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी निवडली. दुसऱ्याच षटकात संघाने दोन्ही सलामीवीर तंजीद हसन तमीम आणि सैफ हसन यांच्या विकेट गमावल्या. ११ धावांच्या स्कोअरवर परवेझ हुसेन तमीमही पॅव्हेलियनमध्ये परतला.बांगलादेशने सततच्या अंतराने विकेट गमावल्या. कर्णधार ह्दोय ५१ चेंडूंमध्ये नाबाद ६१ धावा करून नाबाद परतला. त्याला कोणत्याही फलंदाजाची साथ मिळाली नाही. बांगलादेशसाठी सर्वात मोठी भागीदारी ह्दोय आणि रिशाद (१६) यांच्यात २६ धावांची




झाली. फक्त हेच दोन फलंदाज दोन अंकी धावसंख्या गाठू शकले. ऑस्ट्रेलियासाठी स्पेन्सर जॉन्सन, नेथन एलिस आणि ॲडम झाम्पा यांनी प्रत्येकी २-२ बळी घेतले. निखिल चौधरीला १ बळी मिळाला.


धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियासाठी मिचेल मार्शने वेगवान सुरुवात करून दिली. संघाने ५ षटकांतच ५२ धावा केल्या. नसुम अहमदने जोश इंग्लिसला (१७) बाद करून बांगलादेशला पहिले यश मिळवून दिले. दुसऱ्या बाजूने मार्श धावा करत राहिला. त्याने केवळ २८ चेंडूंमध्ये ७ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ६० धावा केल्या.ऑस्ट्रेलियाने मार्श आणि कूपर कॉनोली (१५) यांच्या रूपात आणखी दोन विकेट गमावले.

**२ वेळा विश्वविजेत्या उरुग्वेला २-२ वर रोखले**
**बेल्जियम - इराणचा सामना ०-० ने बरोबरीत**

## फिफा विश्वचषकात केप वर्डेचा उलटफेर

। कॅनडा । वृत्तसंस्था ।

फिफा वर्ल्ड कप २०२६ मध्ये सोमवारी ग्रुप जी आणि एचचे सामने खेळले गेले. ग्रुप जी मध्ये बेल्जियम आणि इराण यांच्यातील सामना गोलरहित (०-०) बरोबरीत सुटला. तर, ग्रुप तळ मध्ये केप वर्डेने उत्कृष्ट कामगिरी करत दोन वेळच्या विश्वविजेत्या उरुग्वेला २-२ च्या बरोबरीत रोखून मोठा उलटफेर केला. या निकालानंतर दोन्ही ग्रुपमध्ये नॉकआउटची शर्यत आणखी रोमांचक झाली आहे.




केप वर्डेने माजी वर्ल्ड चॅम्पियन उरुग्वेला २-२ च्या बरोबरीत रोखून मोठा उलटफेर केला. मियामीमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात केप वर्डेने पिछाडीवर पडल्यानंतर उत्कृष्ट पुनरागमन करत एक गुण मिळवला. यापूर्वी त्यांनी स्पेनलाही ०-० च्या बरोबरीत रोखले होते. केविन पिनाने ३४ यार्डच्या शानदार फ्री-किकवर गोल करून केप वर्डेला आघाडी मिळवून दिली, पण हाफ-टाइमपूर्वी मॅक्सी अराउजो आणि अगस्टिन कॅनोबियोच्या गोलमुळे उरुग्वे २-१ ने पुढे झाले. दुसऱ्या हाफमध्ये उरुग्वेच्या बचावाच्या चुकीचा फायदा घेत वरेलाने बरोबरीचा गोल केला. यानंतर उरुग्वेने विजयासाठी जोर लावला, पण पिको लोप्स आणि सिडनी लोप्स कॅबरल यांच्या नेतृत्वाखालील केप वर्डेच्या बचावाने सामना मजबूतपणे वाचवत २-२ ने ड्रॉ केला. लॉस एंजेलिसमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात बेल्जियम आणि इराणने ०-० अशी बरोबरी साधली. दोन्ही संघ स्पर्धेत त्यांच्या पहिल्या विजयाच्या शोधात होते, परंतु मजबूत बचाव आणि गोलकीपिंगमुळे कोणताही गोल होऊ शकला नाही. या बरोबरीनंतर दोन्ही संघांचे दोन सामन्यांत प्रत्येकी दोन गुण झाले आहेत. बेल्जियमसाठी स्टार स्ट्रायकर रोमेलु लुकाकूने सुमारे एक वर्षानंतर सुरुवातीच्या अकरामध्ये पुनरागमन केले. दुसरीकडे, इराणचा एक गोल ऑफसाइडमुळे रद्द करण्यात आला. ६६व्या मिनिटाला बेल्जियमला मोठा धक्का बसला, जेव्हा सेंटर-बॅक नॅथन नगोयला रेड कार्ड मिळाले आणि संघाला शेवटची २४ मिनिटे १० खेळाडूंसह खेळावे लागले. असे असूनही, इराण अतिरिक्त खेळाडूचा फायदा घेऊ शकला नाही आणि सामना गोलरहित बरोबरीत संपला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)